गुरूवार, ७ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १९५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 7 MARCH 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-195 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05



## राजूर परिसरात फुलांनी बहरला पळस

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. बाळासाहेब बोराडे

**श्रीक्षेत्र राजूर :** उन्हाळ्याची चाहूल लागताच ऋतू चक्रात अनेक बदल होतो. वसंत ऋतूस प्रारंभ झाला की उन्हाळ्याची चाहूल लागते. या ऋतूत अनेक झाडांची पानझड होऊन पुढील काळात चैत्राची नवीन पालवी फुटते. आंब्याच्या झाडांनाही बहर येतो. परंतु फेब्रुवारी-मार्चमध्ये येणाऱ्या वसंत ऋतूत एक वृक्ष सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यात यशस्वी होतो. तो म्हणजे पळस. प्रदीप ठोकळ या शेतकऱ्याच्या शेतात पळसाचे झाड लाल भडक फुलांनी बहरले आहे. तसेच माळरानावर लालभडक फुलांनी बहरून गेलेला पळस आकर्षित करून घेत आहे. कोरोनात वृक्षमित्रांनी राजूर-देवळगावराजा स्त्याच्या दुतर्फा पळसाच्या बियांची लागवड केली होती.



## तहान शमवण्यासाठी 'रूपा' बोरवेलवर

आधुनिक केसरी न्यूज

चंद्रकांत पतरंगे

**गडचिरोली :** जिल्ह्यातील कमलापूर येथील शासकीय हत्ती कॅम्प मधील रूपा नावाची हत्ती स्वतःची तहान शमवण्यासाठी कमालच करते. कधी आपल्या सोंडेच्या साहाय्याने बोरवेल हापसून पाणी पिते तर कधी येथील कर्मचाऱ्यांच्या मदतीने तहान शमवते. २०२१ मध्ये स्वतः सोंडेच्या साहाय्याने बोरवेल हापसून पाणी पेतांनाचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. आता पुन्हा एक व्हिडिओ समोर आला आहे. येथील कर्मचारी लक्ष्मण बोरवेल हापसून देतो. रूपा देखील तिथेच पाणी पिऊन स्वतःच्या अंगावर देखील पाणी शिंपून घेत आहे. वन कर्मचारी लक्ष्मण देखील हत्तीची तहान शमवण्यासाठी मदत करतो आहे.

# महायुतीचा फॉर्म्युला 37-8-3 ठरला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपावरून सर्वच पक्षात जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. महायुतीच्या जागावाटपाच्या बैठकीतील गोपनीय माहिती बाहेर आली असून 37-8-3 असा फॉर्म्युला ठरला आहे. यामध्ये भाजपला 37, शिंदे गटाला 8 आणि अजित पवार गटाला 3 जागा मिळणार आहेत. पण राष्ट्रावादी अजित पवार गट 9 जागांवर आग्रही आहे. विशेष म्हणजे याआधी भाजप 36 जागांवर निवडणूक लढवेल, अशी चर्चा होती. पण आता हाच फॉर्म्युला बदलल्याचं बघायला मिळत आहे. भाजप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताब्यातील तब्बल 5 जागांवर लढण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला बारामती, रायगड आणि शिरुर या तीन जागा मिळण्याची शक्यता आहे. तसेच शिंदे गटाच्या ताब्यातील तब्बल 5 जागा या भाजपला जाऊ शकतात. यामध्ये हिंगोली, उत्तर पश्चिम मुंबई, कोल्हापूर, पालघर, यवतमाळ-वाशिम या जागांचा समावेश आहे. शिंदे गटाच्या 'या' जागा भाजपला जाणार हिंगोली – भाजप उमेदवार देण्याच्या तयारीत उ.प. मुंबई – भाजप उमेदवार देण्याच्या तयारीत कोल्हापूर – भाजप धनंजय महाडिकांना उमेदवारी देण्याची शक्यता पालघर – राजेंद्र गावित भाजपकडून लढण्याची शक्यता यवतमाळ-वाशिम – भाजप उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत महायुतीच्या जागावाटपाबाबत चर्चा केली. अमित शाह यांची महायुतीच्या प्रमुख नेत्यांसोबत चर्चा केली. यावेळी याबाबत निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या बैठकीत काही निकषांवर जागावाटप निश्चित करण्यात आले. जिंकू शकण्याच्या मेरीटवरच जागावाटप करण्यात आले. विशेष म्हणजे जितके विद्यमान खासदार तो फॉर्म्युला लागू राहणार नाही, असे या बैठकीत ठरले. भाजपची मुंबईमधील 6 पैकी 5 जागांवर उमेदवार देण्याची तयारी आहे. त्यामुळे शिंदे गटाला मुंबईत एकच जागा मिळण्याची शक्यता आहे. उमेदवारांच्या मेरिटपुढे तीनही पक्षांनी एक-एक पाऊल मागे घ्यावे, असे अमित शाह यांनी या बैठकीत सांगितले. तीनही पक्षांच्या उमेदवारांनी आम्ही लढू हा हट्ट धरु नये, असे आवाहन या बैठकीत करण्यात आले. या जागावाटपात फॉर्म्युल्याच्या आकड्यापेक्षा विजयाची खात्री असलेल्या संधी देण्याचा निर्णय झाला.



**शिंदे गटाला 'या' जागा मिळू शकतात**
दक्षिण मध्य मुंबई, कल्याण, हातकणंगले, रामटेक, बुलढाणा, शिर्डी, नाशिक, मावळ
**राष्ट्रवादीचाला 'या' तीन जागा मिळणार**
बारामती, रायगड, शिरुर

## फरार अभियंत्याकडे कोट्यावधीची संपत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** दहा वर्षांपासून पत्नीसह फरार असलेल्या जिल्हा परिषदेच्या छोटे पाटबंधारे विभागातील अभियंता राहूल खाडे यांने भ्रष्टाचार करुन कोटीहून अधिक मालमत्ता भ्रष्ट मार्गाने कमविली असल्याचे लाचलुचपत विभागाच्या चौकशीत आढळले. याप्रकरणी अभियंता खाडेसह पत्नी व मुलीविरुध्द विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे उप अधिक्षक संदीप पाटील यांनी बुधवारी सांगितले. अभियंता खाडे हा शाखा अभियंता म्हणून छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद सांगली येथे कार्यरत आहे. कार्यरत असताना खाडेनी भ्रष्ट व गैर मार्गाचा अवलंब करुन अपसंपदा कमवली असल्या बाबतचा तक्रारी अर्ज लाचलुचपत विभागाच्या कार्यालयास प्राप्त झाल्या होता. या अर्जाच्या अनुषंगाने खाडे यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आली. यामध्ये अभियंता खाडे, पत्नी सरोजिनी खाडे व मुलगी विशाखा खाडे यांनी दि.७.११.१९८९ ते दि.२८.२.२०१५ या परिक्षण कालावधीत ज्ञात उत्पन्न स्त्रोतापेक्षा अधिक ९३ टक्के म्हणजे १ कोटी, २ लाख, ११३ इतकी अपसंपदा भ्रष्ट मार्गाने धारण केली असल्याचे निष्पन्न झाले.

# नाथषष्ठीनिमित्त येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षा, स्वच्छता, सेवा द्या

## पालकमंत्री संदिपान भुमरे : नाथषष्ठी यात्रा महोत्सव पूर्वतयारी आढावा बैठक


आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : नाथषष्ठी यात्रा महोत्सवाचे यंदा ४२५ वे वर्ष आहे. यानिमित्ताने पैठण येथे मंदिरावर सजावट, रोषणाई करतांनाच येणारे भाविक व वारकऱ्यांना सुरक्षा, स्वच्छता आणि सेवा द्यावी,असे निर्देश राज्याचे रोहयो, फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी दिले. नाथषष्ठी यात्रा महोत्सवाच्या पुर्वतयारीसाठीची आढावा बैठक गुरूवारी पैठण येथील नाथमंदिरात घेण्यात आली. पालकमंत्री संदीपान भुमरे हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलिस अधीक्षक (ग्रामीण) मनिष कलवानिया,अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, उपविभागीय अधिकारी (महसूल) नीलम बाफना, मुख्याधिकारी संतोष आगळे, डिवायएसपी विश्वंभर भोर,पोलीस निरीक्षक संजय देशमुख, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे सहाय्यक अभियंता राजेंद्र बोरकर, गटविकास अधिकारी संजय कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. पंडित किल्लारीकर, एसटी आगारप्रमुख गजानन मडके, नाथवंशज हरिपंडीत गोसावी तसेच विविध प्रशासकीय विभाग प्रमुख व विविध सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी प्रशासनातर्फे करण्यात येत असलेल्या तयारीची माहिती दिली. दि. ३१ मार्च, १ व २ एप्रिल या दरम्यान षष्ठी, सप्तमी व अष्टमी असे ३ दिवसीय धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यंदाचे ४२५ वे वर्ष आहे. यात्रा मैदानावरील सफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. तसेच जंतुनाशक फवारणी, मोकाट जनावरांचा बंदोबस्त व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सक्षम करण्याची कामे हाती घेतली आहेत,अशी माहिती आगळे यांनी दिली.




या बैठकीत पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी सांगितले की, यात्रोत्सवात येणाऱ्या भाविकांना उत्तम सुविधा देण्यात याव्या. यंदा प्रथमच शहर व नाथषष्ठी यात्रा मैदानावर जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वारकऱ्यांना सुरक्षा आणि सुविधा उपलब्ध होणार आहेत. येणाऱ्या वारकऱ्यांना शांतता व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था, पार्किंग व रोगराई नियंत्रणासाठी स्वच्छता यासारख्या सेवा देण्यात याव्या, अशा सुचना त्यांनी प्रशासनाला केल्या. संचालन अरुण काळे यांनी केले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

आपल्या धाकट्या जावेला त्या म्हणायच्या, ' ते बघ बाबाराव आलेत, त्यांना ओवाळण्यासाठी आरतीचे ताट तयार ठेव. ' शेवटी पाच फेब्रुवारी १९१९ ला येसूवहिनींनी या जगाचा निरोप घेतला. नंतर ८ फेब्रुवारीला इंग्रज सरकारचे भेटीची परवान्गी दिल्याचे पत्र आले. पण आता काही उपयोग नव्हता. हे जीवनपुष्प ईश्वरचरणी समर्पित झाले होते. उणेपुरे ३४ वर्षांच्या आयुष्यात या माउलीने जे कष्ट सोसले, जो त्याग केला त्याला तुलना नाही.

सावरकर परिवारातील सगळ्या सदस्यांचेच देशासाठी प्रचंड योगदान, त्याग आहे. त्यात सावरकरांचे बंधू, त्यांची पत्नी यांचेही योगदान आहे. या त्यांच्या त्याग, समर्पणाच्या बदल्यात आम्ही त्यांना काय दिले ? स्वातंत्र्यानंतर प्रचंड उपेक्षा, अवहेलना. 1950 मध्ये त्यांची मालमत्ता जप्त करण्यात आली, ती 1966 ला परत मिळाली. गांधीजींच्या हत्येशी त्यांचा संबंध जोडला गेला, की जो सिद्ध होऊ शकला नाही. त्यांच्या घरावर हल्ले झाले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले, त्यांना आम्ही ' हेचि फळ काय मम तपाला ' असे म्हणण्याची वेळ आणली. ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बॅरिस्टरच्या पदवीवर लाथ मारली, त्यांच्यावर आम्ही इंग्रजांची माफी मागितली या सारखे क्षुद्र आरोप केले. अंदमानात त्यांचे राष्ट्रीय स्मारक व्हायला स्वातंत्र्यानंतर बावीस वर्षे जावी लागली.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे देशाप्रती समर्पण, त्यांची अलौकिक काव्य प्रतिभा, येसूवहिनींचा त्याग, समर्पण आणि प्रेरणादायी जीवन यथाशक्ती आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सावरकरांची वहिनीला लिहिलेले सांत्वनपर पत्र,आणि माझे मृत्युपत्र ही दोन मराठी साहित्यातील अजरामर म्हणावीत अशी काव्यरूप पत्रे आहेत. तरुणांनी पाठ करावीत अशी ही आदर्श, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी पत्रे आहेत.



## आनंदी पहाट

# अकारण विचारांमुळे नैराश्य बळावते

आधुनिक केसरी

नकारात्मक विचारांची भिन्नविभिन्न कारणे असतात. अनाहूत नकारात्मक विचार हे ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव डिसऑर्डर, सामान्यीकृत चिंता विकार किंवा इतर मानसिक आरोग्य स्थितीचे लक्षण असू शकतात. नकारात्मक विचार हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. अनाहूत विचार हे नैराश्य, पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर, ऑब्सेसिव्ह कंपल्सिव्ह डिसऑर्डर, बायपोलर डिसऑर्डर, अमली पदार्थांचा वापर डिसऑर्डर आणि अगदी बर्नआउट किंवा तीव्र ताण यासह इतर मानसिक आजारांचेही लक्षणे दिसून येऊ शकतात. प्रमाणापेक्षा जास्त विचार करण्याच्या नियमित पद्धतींमुळे चिंता, चिडचिड, पॅनीक अटॅक तसेच कमी भूक, झोपेची अनियमित पद्धत, उच्च रक्तदाब आणि बरेच काही होऊ शकते. जेव्हा स्वतःला समजूतदार ठेवायचे असते तेव्हा भावना महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. काळजी करणे आणि जास्त विचार करणे थांबवण्यासाठी मेंदूला फसवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मेंदूतील रसायने गोंधळ निर्माण करणे, विस्मरण होणे आणि लक्ष विचलित करणे तसेच मानसिक स्पष्टतेचा अभाव तयार होणे हे या द्वारे दर्शविले जाते. अनेकदा हे सर्व जास्त काम करणे, झोप न लागणे, तणाव आणि संगणकावर जास्त वेळ घालवणे यामुळे देखील होऊ शकते. अतिविचार हा स्वतःहून निर्माण केला जाणारा केवळ मानसिक विकार नाही. ते सहसा इतर मानसिक आरोग्य स्थितींशी संबंधित असते. नैराश्य, चिंता विकार, आजारपण चिंता विकार, ज्याला काहीवेळा हायपोकॉन्ड्रियासिस किंवा आरोग्य चिंता म्हणतात, आपण गंभीरपणे आजारी आहात किंवा होऊ शकता याची जास्त काळजी करत बसण्याने देखील नैराश्य आणि नकारात्मकता बळावते. त्याबाबतीत तुम्हाला कोणतीही शारीरिक लक्षणे नसतील, अतिविचार हा स्वतःचा मानसिक आजार नसला तरी देखील तो नैराश्य, चिंता, खाण्याचे विकार आणि पदार्थांच्या वापरातील विकार यासारख्या परिस्थितींशी संबंधित असू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## जीव जगवितो | आत्माराम ||

नभ हा मंडप | कोण सावरतो ? ||
कोण सारवतो |पृथ्वीला ह्या ||१||
अंकुरही येथे | कोण रूजवितो ||
गगन चुंबितो | तरू कैसा ? ||२||
कासवीच्या पील्ला | कोण वाढवितो ||
कैसा पाझरतो | दृष्टी पान्हा ||३||
अथांग सागरा | कोण अडवितो ||
कोण चालवितो | कालचक्र ||४||
श्वासाच्या वारीत | अखंड चालतो ||
जीव जगवितो | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज




गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

अथर्ववेदात चौथ्या भागातील श्लोकात वर्णन केले आहे की ही पृथ्वी, हे आकाश, हे जल,हे सर्व आकार सर्व त्याचेच,म्हणजेच ईश्वराचे आहेत.हे ईश्वराने बनवले आहेत.हे सर्व काही त्रैलोक्यसहित त्या ईश्वरातच सामावलेले आहे.तरीही तो राहतो मात्र एका छोट्याशा तलावाच्या तळाशी. या सृष्टीचा निर्माता करता, धरता, पालक संहारक,सर्वकाही असूनही तो तटस्थ,निर्विकार निर्गुण, निराकार बनून राहतो.अशा अवस्थेत हा सृष्टी क्रम चालवण्याचे, चैतन्य प्रसारणाचे कार्य त्या ब्रह्म तत्त्वाची महाशक्ती करीत असते. ही महाशक्ती भगवंताची भगवती शक्ती आहे.ती त्रिगुणात्मक त्रिपुरा सुंदरी, विद्या माया आहे.ती संकटाचे निवारण करणारी, सुख-समृद्धी देणारी,निसर्गाचे संतुलन राखणारी,जीविताचे रक्षण करणारी,अशुभ विनाश करणारी,असूरी बुद्धी, असुरी प्रवृत्ती, असुरी कार्य करणाऱ्यांचा विनाश करणारी महामंगल शक्ती आहे. ही शक्ती ब्रह्म आहे. ब्रह्म शक्ती आहे ती. अभय दाता आहे.भगवान श्री स्वामी समर्थ भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी या अभय दानाने मानवाला जी श्रद्धा पूर्ण शक्ती प्रदान करतात तीच महा सरस्वती, महाकाली, महालक्ष्मी शक्ती ज्ञान, इच्छा, कर्म यांचे कल्याणकारी स्वरूप आहे. मानवाचा उद्धारक परमेश्वर व त्याची चैतन्यशक्ती एकमेकांपासून वेगळे नाहीत. ही चैतन्य शक्ती परमेश्वराच्या अंश रूपाने सर्वसृष्टीत सर्व सजीव निर्जीवात दिसत आहे." या देवी सर्वभूतेषु चैतन्य रुपेण संस्थिता ःनमस्तसै नमस्तसै नमस्तसै नमो नमः" मानवाच्या सदगुणांचे,सदविचारांचे संवर्धन करणारी, मानवाच्या सत्करमाला आनंदाचे फल देणारी, मानवाच्या सदिच्छांना तथास्तु म्हणणारी, मानवाच्या सुखासाठी भौतिक समृद्धी देणारी,मानवाच्या अंतकरणात सतप्रेरणा जागवणारी ही शक्ती कणाकणात सामावली आहे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अमृत सागर उमड़िया,
सूझे वार न पार ।परमानन्दित हँस है,
छूटत यह संसार ।।३७।।
(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम
अध्याय) ०२/०१/३७
मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
अपरिमित उसळता असा अमृत
सागर प्राप्त झाल्यावर शुद्ध आत्मा
परमानंदित होतात आणि दुःखमय
संसार सुटून जातो.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# ज्याला समाधान तो भाग्यवान

आधुनिक केसरी

ज्याचे ‘ हवेपण ’ जास्त असते तो गरीब जाणावा, आणि ज्याचे हवेपण कमी असते तो श्रीमंत जाणावा. परमार्थी म्हणजे भिकारी असे ज्याला वाटते, त्याला श्रीमंतीची खरी कल्पनाच नाही. ज्याला नेहमी समाधान वाटते तोच खरा श्रीमंत. आमचा आधार पैशाचा; तो आज आहे अन् उद्या नाही. पायाच जिथे डळमळीत तिथे इमारत कुठे पक्की होईल ? श्रीमान् याचा अर्थ भगवंताशिवाय श्री असणारा असा होऊ नये, याची श्रीमंतांनी काळजी घ्यावी. खरे म्हणजे समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य, आणि हेच खरे ऐश्वर्य होय. ज्याला समाधान जास्त, तो जास्त भाग्यवान समजावा. समाधान हे आपले आपल्याला घ्यायचे असते, दुसरा कोणी ते आपल्याला देऊ शकत नाही. खरोखर, समाधानासारखे औषधच नाही. ते मिळत नाही म्हणून इतर औषधे घ्यावी लागतात. काळजी नाहीशी झाली की अखंड समाधान, शांती आणि आनंद मिळतो. पैलवानासारखा दिसणारा एक गृहस्थ होता, त्याला विचारले तर तो म्हणाला, “ अहो,



मला मधुमेह झाला आहे; मी आतून पोखरला गेलो आहे ! त्यापेक्षा तुम्ही बरे. ” खरोखर, त्याचप्रमाणे पैशापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची अवस्था आहे. फक्त भगवंताच्या निष्ठेमध्ये समाधान आहे. ते राजवाड्यामध्ये नाहीच नाही, पण ते झोपडीमध्येही नसेल. असमाधान हा रोग सर्वांनाच असल्यामुळे रोगांच्या यादीतून त्याचे नावच निघून गेले आहे ! सध्या जगात पुष्कळ सुधारणा झालेल्या आहेत. पण त्यांनी माणसाला समाधान मिळालेले नाही. जीवन सुखी न होता मनाला जिच्यामुळे हुरहुर लागते ती सुधारणा कसली ? व्यक्ती काय किंवा समाज काय, यांची सुधारणा घडवून आणायला चित्त स्थिर झाले पाहिजे. चित्ताची ही स्थिरता धर्माशिवाय येणे शक्य नाही. हल्लीचे तत्त्वज्ञान नुसते अभ्यासी आहे, अनुभवाचे नाही; म्हणून त्याने खरे समाधान लाभणार नाही. खरोखर, प्रत्येक जीवाला भगवंताची तळमळ लागली पाहिजे. भगवंताशिवाय जो राहतो त्याला सुखदुःख येते; आणि सुख म्हणजे तरी काय, दुःखाची कमतरता ते सुख ! राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला काहीतरी मिळावेसे वाटते; म्हणजे प्रत्येकाला काहीतरी कमी आहे. पण कुणी असा विचार करीत नाही की, जे आज कमी आहे ते पूर्वी आपल्याजवळ असताना तरी आपण सुखी होतो का ? याचे उत्तर ‘ नाही ’ असेच मिळते. ताजी जिलबी कल्पनेने खाण्यापेक्षा शिळ्या जिलबीचा तुकडा प्रत्यक्ष खाण्यामध्ये जास्त समाधान आहे. बुद्धीचा आनंद हा उपाधीचा आणि कल्पनेचा आनंद आहे, भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. हा आनंद मिळवायला भगवंताला शरण जाऊन त्याच्या नामात राहणे हा एकच उपाय आहे.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माडूक्य उपनिषदात सांगितले आहे की ओं इति एतद् अक्षरं इदं सर्वम ओं हे अक्षरमंच हे सर्व विश्व आहे. आपण त्याला विश्वमन हे नाव देऊ. समर्थाना समाजाची किती काळजी होती हे पुढील समासातून अभ्यासता येते.

या समासात समर्थांनी विश्व मनाचे वर्णन केले आहे. साधना वाढवली की साधकांची जाणीव देहाच्या बाहेर असते. साधनेतून ती सुक्ष्म बनत जाते.त्यामुळे सर्व जीवांच्या जाणिवेशी समरस होऊ शकते. अशा रितीने माणसाच्या जीवनाला व्यापकपणा येऊन अखेरं तो *महात्मा *महान आत्मा होतो्

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरूवार, ७ मार्च २०२४

adhunikkesari.com





# अवैध तंबाखूवर स्थानिक गुन्हे शाखेची धाड

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरातील वडगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेने एका घरी धाड टाकत दिड लाखाचा सुगंधित तंबाखू जप्त करून एकाला अटक केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी जिल्ह्यात सुरू असलेला प्रतिबंधित सुगंधित तंबाखूच्या व्यापारावर आता प्रतिबंध घालणे सुरू आहे. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक, यांनी कारवाईची सूत्रे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांच्याकडे सोपवली. दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेने ५ मार्च रोजी रात्री अंदाजे ९.३० वाजताच्या सुमारास वडगाव येथील अजय विजय गुंडोजवार याच्या घरी धाड टाकली असता त्याठिकाणी सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. धाडीत मजा हुक्का शिशा तंबाखू सह विविध प्रतिबंधित पान मसाला साठा एकूण किंमत १ लाख ५७ हजार २६२ रुपयांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेने जप्त केला. यावेळी बाबूपेठ येथील विलास शेंडे हा आरोपी पसार झाला. आरोपी अजय गुंडोजवार याच्यावर अन्न व सुरक्षा मानके कायद्यानुसार विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु, महेश कोंडावार पोलिस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांचा मार्गदर्शनाखाली किशोर शेरकी सपोनि, पोहवा अनुप, पोहवा मिलीद, पोहवा नितेश, पोहवा जमीर, पोअ प्रसाद यांनी केले.

# हा लोकशाहीचा विजय व संविधानाचा सन्मान होता : हंसराज अहीर

## जेव्हा जेव्हा मी जिंकलो, पक्ष जिंकला, पक्षाचे विचार जिंकले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा १९९६ मध्ये पहिल्यांदा जिंकलो. १९९१ च्या निवडणुकीमध्ये भाजपा तिसऱ्या क्रमांकावर होता त्यानंतर एकूण ४ वेळा जिंकलो. माझ्या मूळ जातीची फक्त १५० परिवार असतील तरी पण पक्षाने मला वारंवार उमेदवारी दिली, ४ वेळा विजय झाला. ही माझ्या पक्षाची व चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील जनतेची महानता आहे. मी लोकसभा जिंकलो तेव्हा पक्ष जिंकला, पक्षाचे विचार जिंकले, लोकशाहीचा विजय ठरत होता, संविधानाचा सन्मान होत होता. निवडणूक ही विचारांची असते. पुढेही लोकशाहीला हेच अभिप्रेत आहे. मी चारित्र्य सांभाळले, जनतेच्या मताचा आदर केला. ही निवडणूक सुद्धा पक्ष जिंकेल. चंद्रपूर भाजपचा गड आहे. दुर्देवाने मागची निवडणूक आम्ही जिंकलो नसलो तरी आमची एकता, एकाग्रता पक्ष बांधणीतून आम्ही विजयाकडे चाललो आहे. मिशन महाविजय-२०२४ महाविजय संकल्प ४०० पार, प्रधानमंत्री मोदी जी ३ री बार यात



चंद्रपूर राहिलच. आम्ही लढू, आम्ही जिंकू. माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी नुकतीच ही प्रतिक्रिया दिली असून , त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे चंद्रपूर लोकसभेच्या उमेदवारीवर हंसराज अहिर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार का ? अशी चर्चा आता जोर धरायला लागली आहे. कालच महाराष्ट्राचे वन सांस्कृतिक मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले सुधीर मुनगंटीवार यांनी मीट द प्रेस मध्ये बोलताना माझी लोकसभेत जाण्याची इच्छा नाही  तसा माझा विचार मी पक्षश्रेष्ठींना कळविलेला आहे. परंतु, पक्षाने आदेश दिल्यास पाहू असे मत व्यक्त केले होते. या पार्श्वभूमीवर हंसराज अहिर यांनी आज दिलेली ही प्रतिक्रिया निश्चितच आता चंद्रपूरच्या लोकसभेच्या उमेदवारीवर हंसराज अहिर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल अशी चर्चा आता चंद्रपुरात व्हायला लागली आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लोणार तहसीलवर आज तीव्र निदर्शने : डॉ. गोपाल बछिरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** ६ शेतकरी राजा यांच्या न्याय्यमागण्या साठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने लोणार तहसील कार्यालयावर ७ मार्च रोजी तीव्र निदर्शने करण्यात येणार आहे याकरिता मोठ्या संख्येने शेतकरी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनीनकेले आहे.  त्याचबरोबर तीव्र निदर्शने करूनही जर शासन जागे झाले नाही तर तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा काढण्यात येईल असे ही सांगितले शेतकऱ्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे : १ ) लोणार मेहकर तालुक्यात झालेल्या गारपीटीमुळे मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्याच्या शेतीचे पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाई द्यावी.  २) सन २०१९-२० ला ठाकरे सरकारने ज्याप्रमाने सोयाबीन ला ८००० व कापसाला ११००० रुपये दिला होता तोच भाव द्यावा. ३) दुष्काळाचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही दे त्वरित देण्यात यावे. ४) पीक विम्याची रक्कम अद्याप शेतकऱ्यांना दिलेली नाही पूर्ण पीक विमा शेतकऱ्यास देण्यात यावा. ५) अतिवृष्टीची आर्थिक मदत अद्याप सर्व शेतकऱ्यांना मिळालेली नाही ती सर्व शेतकऱ्यांना देण्यात यावी. ६) शेतकऱ्यास कृषी विभागाकडून मिळणारी सबसिडी गत दोन वर्षात दिलेली नाही ती त्वरित देण्यात यावी. ७) वर्ष २०१२-१३ व २०१६-१७ मध्ये केलेली कर्जमाफी योजनेचा लाभ निम्म्यापेक्षा जास्त शेतकऱ्यास मिळालेलाच नाही ते देण्यात यावा. ८) वन्यप्राणी रोहि (निलगाय) जंगली डुकरे, हरीण यांच्याकडून झालेल्या पिकांची नुकसान भरपाई त्वरित देऊन वन्य प्राण्यांच्या त्रासापासून शेतकऱ्यांची सुटका करण्यात उपाय योजना करावी. ९) शेतकऱ्यास विना खंड अखंडपणे आठ ते बारा तास शेतीसाठी वीजपुरवठा करण्यात यावा.



मेहकर लोणार तालुक्यातील शेतकरीराजा यांच्या संबंधित या नऊ मागण्या विषयी तातडीने 6 मार्च पर्यंत शासनाने निर्णय घ्यावा व मागण्या पूर्ण करण्यात याव्या अन्यथा शासन व प्रशासन यांच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षच्या वतीने लोणार येथील तहसील कार्यालयावर दि. ०७ मार्च रोजी सकाळी ११ वाजे पासून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहे. या तीव्र निदर्शनास सर्व शेतकरी बंधू भगिनी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना ऊबाठा चे डॉ. बछिरे यांचे सह जिल्हा उपप्रमुख आशिषभाऊ रहाटे, लोणार तालुका प्रमुख ॲड दीपक मपरी मेहकर तालुका प्रमुख लिंबाजी पांडव लोणार शहर प्रमुख गजानन जाधव, मेहकर शहर प्रमुख किशोरभाऊ गारोळे, युवातालुकाधिकारी मेहकर ॲड आकाश घोडे, लोणार युवातालुकाधिकारी जीवन घायाळ, कृ.उ.बा.स. संचालक विजय मोरे, तेजराव घायाळ, तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, तालुका संघटक कैलास अंभोरे, महिला तालुकाप्रमुख संजीवनी वाघ, युवा सहरप्रमुख श्रीकांत मदनकर, प्रकाश सानप, सुधन अंभोरे, शाम राऊत, राजुभाऊ बुधवत, विठ्ठलराव घोडके, तानाजी मापारी, लुकमान कुरेशी, उमर सय्यद, इकबाल कुरेशी, अमोल सुटे, तानाजी अंभोरे, अश्रुबा धारकर,पंढरी सुलताने, गफार शहा, लालूभाई मुल्लाजि, गोपाल खोतकर, वसीम शेख, राजू दहातोंडे, भागवत दहातोंडे, फिरोज खान पठाण, ज्ञानेश्वर सरोदे, अजय बछिरे, किरण कमडे यांनी केले आहे.



# महात्मा फुले अमृतकाळ मोबाईल प्रणालीचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रातंर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या 'फुले अमृतकाळ' या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण आज कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार बाळासाहेब आजबे, आमदार संग्राम जगताप, कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी आयुक्त प्रवीण गेडाम, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू कर्नल डॉ. पी.जी. पाटील तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी, वातावरणीय बदलामुळे पावसाने दिलेली ओढ, अतिवृष्टी, ढगफुटी, वाढते तापमान, उष्माघात व पावसाचा अकल्पित लहरीपणा अशा गोष्टी वारंवार घडत आहेत. त्यामुळे पशुधनास चारा व पाणी पुरविण्यावर तर परिणाम होतच आहे, पण पशुधनाच्या आरोग्यावर देखील गंभीर परिणाम होत आहे. संकरीत गाई व म्हशींमध्ये दुग्ध उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. दुभत्या गाईचे दुध उत्पादन ५ ते २० टक्क्यांपर्यंत घटल्याचे आढळून आले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी हे ॲप महत्वाची भूमिका पार पाडेल असे धनंजय मुंडे यांनी सांगितले. या ॲपचाद्वारे शेतकऱ्यांना जनावरांचा उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे, योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे, फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलित पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील.



# भीमनगर भीमजयंती उत्सव समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त भिमनगर साक्री रोड येथील भिमनगर जयंती उत्सव समिती तर्फे सालाबादप्रमाणेच कार्यसम्राट माजी नगर सेवक जितुभाऊ शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली १ मार्च ला बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.  यावेळी बैठकीला समस्त भिमनगर मधील युवा भिम सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते , बैठकीत अध्यक्ष पदि धनराज जितेंद्र शिरसाठ उपाध्यक्ष पदि किरण दादाभाऊ ढिवरे, विनायक इंगळे, गौतम शिरसाठ, संतोष बागुल , निलेश जिरे यांची जयंती उत्सव कार्यकारिणी वर निवड करण्यात आली आहे. सदर बैठकीत भिमनगर मधील कर्तव्यदक्ष मा.नगर सेवक जितुभाऊ शिरसाठ व अनेक वरीष्ठ मान्यवर यांनी मार्गदर्शन केले व सालाबादप्रमाणे यावर्षी देखील भिमनगर येथेच भिम जयंती जल्लोषात साजरी करण्याचे ठरविण्यात आले.

# वंचित कुणाकडे ?

आधुनिक केसरी

वंचित बहुजन आघाडीकडून लादण्यात येणाऱ्या अटी, पक्षाकडून तीन उमेदवारांची झालेली घोषणा यामुळे वंचितबरोबर आघाडी होण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते साशंक आहेत. वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीबरोबर यावे यासाठी प्रयत्न झाले आहेत. पण प्रकाश आंबेडकर यांची विधाने तसेच पक्षाची एकूणच भूमिका यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आघाडीबाबत साशंकता आहे. वंचित बहुजन आघाडीकडून लादण्यात येणाऱ्या अटी, पक्षाकडून तीन उमेदवारांची झालेली घोषणा यामुळे वंचितबरोबर आघाडी होण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते साशंक आहेत. वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीबरोबर यावे यासाठी प्रयत्न झाले आहेत. पण प्रकाश आंबेडकर यांची विधाने तसेच पक्षाची एकूणच भूमिका यावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आघाडीबाबत साशंकता आहे. वंचितने २७ जागांवर आमची ताकद असल्याचे आधी पत्र दिले. पक्षाला नक्की किती जागा हव्या आहेत हे स्पष्ट केले नाही. याशिवाय १५ ओबीसी व तीन अल्पसंख्याक उमेदवार असावेत, काही उमेदवारांना पाठिंबा द्यावा अशा विविध अटी घातल्या आहेत. जातनिहाय उमेदवार उभे करावेत ही अट मान्य करण्यास महाविकास आघाडीच्या नेत्यांचा विरोध आहे. अल्पसंख्याक उमेदवार उभा केल्यास मतांचे ध्रुवीकरण होते. यामुळे धार्मिक आणि जातनिहाय आधारावर उमेदवार उभे करण्यास आघाडीचा विरोध आहे. वंचितने तीन उमेदवारांच्या नावांची घोषणाही केली. अकोल्यातून प्रकाश आंबेडकर यांना पाठिंबा देण्यास तिन्ही घटक पक्षांची तयारी आहे. अकोल्याच्या जागेवर कोणीच दावा सांगितलेला नाही. पण उर्वरित दोनमध्ये वर्धा आणि सांगली या दोन मतदारसंघांवर काँग्रेसचा दावा आहे. वर्धा आणि सांगली हे दोन्ही मतदारसंघ वंचितला सोडणे शक्य नसल्याचे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे. लोकसभा निवडणुकीनंतर शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने भाजपशी हातमिळवणी करणार नाही, असे लेखी देण्याची अट वंचित आघाडीचे नेते अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी घातली. ही अट दोन्ही गटांच्या नेत्यांनी स्पष्टपणे फेटाळली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि ठाकरे (उभाठा) गट यांच्या महाविकास आघाडीत वंचित आघाडी या चौथ्या मित्रपक्षाला स्थान देण्याचा प्रयत्न सुरु आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत या पक्षाने थेट २७ जागांची मागणी केली आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत या चौथ्या मित्र पक्षाला जास्तीत जास्त दोन जागा देण्याबद्दल चर्चा सुरु आहे. एकटे लढल्यास २७ पैकी ६ जागा निवडून येतील असा दावा वंचितने केला आहे. महाविकास आघाडीत सामील होताना भाजपशी हातमिळवणी करणार नाही हे लिहून द्या या वंचितच्या अटीवर आघाडीतील सर्वच नेते संतप्त झाले आहेत. अशा प्रकारे काहीही लिहून देता येणार नाही, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत व शरदचंद्र पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी स्पष्ट केले.


# गडकरीचं काय होणार ? गडकरीच खासदार होणार



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या राजकारणात शिल्लक राहिलेल्या उद्धवजी ठाकरे अर्थात उबाठा शिवसेनेची राजकिय अवस्था मुंगीएवढी झाल्याने संघटनात्मकदृष्ट्या कामच काही शिल्लक राहिलेले दिसत नाही. लोकसभा निवडणुकीत एकाही जागेचा भरवसा नसल्याने महाविकास आघाडीच्या सोबत जागा वाटप किंवा इतर अनौपचारिक चर्चा अधुनमधुन रंगवुन दाखवताना दिसतात. परिणामी भाजपासारख्या पक्षाच्या आत डोकावुन पहाण्याची सवय जास्तीच वाढलेली दिसते. एक गोष्ट खरी आहे की, मुख्य प्रवक्ता संजय राऊतांना दुसऱ्याच्या घरात वाकुन बघण्याची जास्त सवय जडल्याने मालक देखील त्याच तोऱ्यात आता निवडणुकीच्या तोंडावर भाजपाच्या अंतर्गत कारभारात डोकावताना दिसु लागले.**



काय तर म्हणे नितीन गडकरींना पहिल्या यादीत उमेदवारी का नाही? त्यांचं काय होणार? अशा शंका ठाकरे-राऊत बोलुन दाखवु लागले. तो त्यांचा अधिकार देखील नाही. भाजपाने सोळा राज्यातील यादी पहिल्या टप्प्यात जाहिर केली. संघटनात्मकदृष्ट्या महाराष्ट्र अजुन यादी दृष्टीने हातावर घेतलेला विषय नाही. दोन दिवसात कदाचित चित्र स्पष्ट होईल. यांना गडकरीचा जास्त पुळका आहे का भाजपचा द्वेष आहे? हे खरंच आहे की महाराष्ट्र जाहिर होताना गडकरीचं नाव पहिलं असु शकतं. त्याहुन अधिक नागपूरात गडकरीच खासदार होवु शकतात. मातोश्रीच्या मालकाला आणि संजयाला जास्तच काळजी असेल तर मग गडकरींच्या विरोधात महाविकास आघाडीचाच उमेदवार देवु नये ही भुमिका ते घेतील का? गडकरीचं काय होणार? ही काळजी भाजपमधल्या कुठल्याही कार्यकर्ता असो कि पदाधिकाऱ्यांना अजिबात नाही. राजकियदृष्ट्या गडकरी हे सुरक्षित व्यक्तिमत्व आहे. पण महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा नेत्यांना गडकरीची लागलेली काळजी हे खऱ्या अर्थाने नवल म्हणावे लागेल. संजय राऊतांना प्रश्न कुठलाही असो, कोणत्या ना कोणत्या माध्यमातुन माध्यमाच्या समोर रोज गेल्याशिवाय करमत नाही. राजकिय आरोप प्रत्यारोपाचा सामना यासाठीच जणु काही त्यांचा जन्म झाला असावा. गंमत बघा, वर्तमान देशाच्या राजकिय स्थितीत लोकसभा निवडणुका तोंडावर आल्याने सारेच पक्ष आपआपल्या परीने संघटनात्मकदृष्ट्या कामाला लागलेले दिसतात. अगदी मनसेसारखा पक्ष देखील मागे नाही. राज ठाकरे स्वतः वेगवेगळ्या भागात जावुन जनसंपर्क करताना दिसतात. पण जेव्हा स्वतःचा पक्ष अगदी मुंगीएवढा होतो तेव्हा खरंच आहे की, जास्त काम आपल्याकडे नसल्याने दुसऱ्याच्या घरात वाकुन बघण्याची सवय मालकाला आणि गड्याला लागणे साहजिकच. महाविकास आघाडीचं जागा वाटप अद्याप होईना. वंचित आघाडीचे नेते डॉ.प्रकाश आंबेडकरांना सोबत घेण्यासाठी काँग्रेससह राष्ट्रवादीचे नेते देखील अनुकुल दिसत नाहीत. वेळप्रसंगी उद्या उबाठा आणि वंचित दोघांमध्येच युती होवु शकते? शिवाय काँग्रेस उबाठाला हव्या त्या जागा देखील द्यायला तयार नाहीत. असे अनेक प्रश्न समोर असताना एवढेच नव्हे तर संभाजी नगरात चंद्रकांत खैरे का अंबादास दानवे? खुप कुटाणे आपल्याकडे इतर असताना देखील उबाठा नेत्यांना नितीन गडकरींची लागलेली काळजी हे म्हणजे नेमकं प्रेम कशाचं आहे? भाजपाचा एकीकडे द्वेष करायचा तर दुसरीकडे व्यक्तिनिष्ठ नावाने प्रेम दाखवायचं. गडकरीवरचं प्रेम उबाठा नेते व्यक्त करताना त्यांनी देशात रस्ता बांधणीत केलेला विकास प्रगतीचं पाऊल म्हणुन सांगतात याचाच अर्थ स्वतः उद्धव ठाकरे आणि संजय राऊत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत भुमिकेला मान्यता देतात हे नक्कीच. खरं तर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी अद्याप सुरू झाली नाही. 15 मार्चपर्यंत आचारसंहिता जाहिर होईल. प्रत्येक पक्ष लोकसभा उमेदवार ठरवण्यात गुंग आहे. असं असताना सत्ताधारी भाजपाला विजयाची खात्री 100 टक्के असल्याने सर्वात अगोदर 16 राज्यातील लोकसभेचे उमेदवार जाहिर केले. महाराष्ट्र अद्याप मागे आहे. कारण महायुती महाराष्ट्रात असुन संघटनात्मकदृष्ट्या सर्व घटक पक्षांना सोबत घेवुन उद्या परवा यादी जाहिर होवु शकते. कुठल्याही प्रकारचा वाद महायुतीत नाही. जो सद्या महाविकास आघाडीत दिसुन येतो. पण या दोघांना काळजी भाजपाच्या यादीची लागलेली दिसते. स्वतःच्या मुखपत्रात देखील गडकरीचं काय होणार? या सदराखाली अग्रलेख लिहिले. एक गोष्ट खरी आहे की नागपूरातून गडकरीचं खासदार होणार. पण भाजपाच्या द्वेषाचा कावीळ झाल्यागत उबाठा नेत्यांची मानसिकता सद्या तरी महाराष्ट्राच्या राजकारणात अस्थिर असुन आपला एखादा तरी खासदार निवडुन आणता येतो का? हे मात्र त्यांच्यासमोर आवाहन मोठं असल्याचे लक्षात येतं. खरं म्हणजे दुसऱ्याच्या पक्षात एवढं वाकुन बघण्याची गरजच काय? भाजप आणि पक्ष नेतृत्व सर्व काही करण्यासाठी सक्षम आहे. पण उगीच कुठल्याही गोष्टीचा पराचा कावळा करायचा आणि काही तरी विष कालव्यागत बडबडत रहायचं हा उद्योग विनाशकाले विपरीत बुद्धी असुन मुळ पक्ष रसातळाला गाडल्या गेला. शिल्लक राहिलेला पक्ष देखील बुडात वरचेवर खोलात जातो आहे हे अशा प्रवृत्तीवरून लक्षात येतं. भाजपाच्या एखाद्या नेत्याची जाहिर स्तुती ही मंडळी करते तेव्हा एक मात्र निश्चित आहे की, गडकरीची स्तुती करणं म्हणजे भाजपाच्या विकास भुमिकेचं कौतुक करणं. संजय राऊत जसं म्हणतात की, गडकरीमुळे देशात रस्ते विकास झालेला दिसतो याचाच अर्थ केंद्रात भाजपा सरकार विकासाच्या दृष्टीने पुढे असल्याचे गतिमान असल्याचे संजय राऊतानं मान्य केलं कारण भाजपात मंत्री असो की कार्यकर्ता असो, विकासाची प्रक्रिया असो की संघटनात्मक प्रक्रिया असो इथे व्यक्तिनिष्ठ राजकारण चालत नाही. पक्षाचं चिन्ह आणि सामान्य कार्यकर्ता हे श्रेष्ठत्व आणि प्राधान्य भाजपात काम करणाऱ्या प्रत्येक चराचर कार्यकर्त्याचं असतं. पण ज्यांच्या विचाराला कुठलाही वैचारिक आधार नसतो असं तत्वज्ञान केवळ मनोरंजनात्मक आणि वेळ मारून पुढे जाण्यासाठी कामाला येतं तसाचा उद्योग सद्या उबाठा नेत्यांचा दिसुन येतो. गडकरी स्पष्ट वक्ते आहेत किंवा त्यांच्या अंगी कार्यकर्ता आणि नेता पदाचे असलेले सद्गुण आदर्श देणारे असतात. हे तर देशातील कुणालाही मान्य करावेच लागेल. पण उबाठाकडे असा एखादा तरी नेता आहे का ज्यांना गडकरीच्या रांगेत किमान तुलनात्मकदृष्ट्या उभं करता येईल? खरं तर छोट्या छोट्या पक्षाला देखील लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दुसऱ्याच्या पक्षात डोकावुन पहायला सद्या वेळ अजिबात नाही. मात्र उबाठा नेत्यांना स्वतःच्या पक्षात जास्तीचं काम नसल्याने वेळच वेळ शिल्लक राहिलेला दिसुन येतो. कारण दुसऱ्याच्या घरात नुसती उठाठेव शेजाऱ्याने करणं म्हणजेच संशयाचं जाळ निर्माण होणं? अशी कृती उबाठा नेत्यांनी जास्त करावीच का? हा प्रश्न देखील आता सामान्य जनता पुढे होवुन विचारू लागली. जास्तच जर काळजी खऱ्या अर्थाने उद्धव ठाकरे यांना नितिन गडकरींची असेल तर त्यांनी नागपूरातून महाविकास आघाडीचा उमेदवार गडकरींच्या विरोधात देता कामा नये? एवढेच नव्हे तर नागपूरची जागा किमान उबाठा पक्षाकडे मागवून घ्यायला हवी. उगी बोलायचं आणि बडबड करायची किंवा राजकारणातली वेळ मारून न्यायची याच भुमिकेत सद्या ही मंडळी काम करताना दिसते. 2019 ला भाजप सोबत होते म्हणुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कृपेने तुमचे खासदार निवडुन आले होते. आता दुध का दुध पानी का पानी एखादा तरी खासदार निवडुन येईल का?एवढाच राजकिय हिशोब जरी तुम्ही करत बसलात तुमची तुम्हाला लखलाभ. तुम्ही नका करू गडकरींची काळजी, त्यासाठी भाजपा आणि नेतृत्व सक्षमच होय.

# स्वतः मध्ये सकारात्मक बदल घडवण्याचे तंत्र अध्यात्म



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनात सकारात्मक बदल घडवण्याच तंत्र म्हणजे आध्यात्म आहे.विषयाचं खरं मुळ सापडल्या शिवाय उत्कर्ष घडत नाही.आपण मुळ न शोधता वरकरणी खोटं खोटं समाधान शोधण्यात मग्न आहेत. खोट्या समाधानाल जास्त मोहित होन हेच मुळात दुर्भाग्य आहे.सुक्ष्म आणि अति सुक्ष्म बाबी पासुन विराट आति विराट बाबी संदर्भात स्वतः मध्ये सार्थक बदल घडवून निसर्गाच्या रचनेतील सर्व चांगल्या बाबी आपण स्वीकारून त्याच कृतीशील आचरण केले तर जीवन सार्थक होईल.पण आपण सार्थक अध्यात्म करत नाहीत. तर निरर्थक अध्यात्म करण्यासाठी मात्र अटोकाट प्रयत्न करतो याला मानवी स्वभाव मानवी वृत्तीचा भाग म्हटलं तरी वेगळं ठरणार नाही.प्रत्येकाने स्वतःच कल्याण होण्यासाठी अगोदर प्रयत्न केला तर जगाचं कल्याण आपोआप होईल.पण असं होतं नाही.**

आपण स्वतःला सोडून जगाला शिकविण्यासाठी उतावीळ असतो.इथंच गडबड होते.म्हणजे आध्यत्म हे आजुन तरी आपल्याला निट समजलं नाही अथवा कळलं नाही.असंच काहीसं गणित आहे या आधी स्वतःकडे पाहिल पाहिजे.आत्म उद्धार आत्म ज्ञान जागृत केल पाहिजे.ज्ञान अवगत करून संसारीक दुःख वेदना याचा त्रास कमीत कमी कसा होईल आणि  कर्म करताना प्रत्येक बाब निरपेक्ष भावनेने कशी त्रयस्थ म्हणून पुर्ण करता येईल यासाठी स्वतःला घडवण म्हणजे आध्यत्म.आपल्या आजुबाजुला पाहण आणि तसंच आचरण करण हा मुळ मानवी स्वभाव असल्याने आपण खरया अर्थाने अध्यात्मापासुन वंचित रहतो. अध्यात्म या विषयावर अनेकांचं मत भिन्न भिन्न असु शकतं.ते असणं गैर नाही. पण अध्यात्म हे बाहेर जगात सापडणारी बाब नाही.ते कुठेही कितीही फिरल्यानंतर सापडणं शक्य नाही. स्वतः मध्ये आध्यत्मिक वृत्ती निर्माण करणं आणि स्वतःला घडवण म्हणजे आध्यत्म स्वतःला घडवताना आवश्यक असणार्या बाबीवर लक्ष केंद्रित करून त्या पद्धतीने कार्य करण गरजेचे आहे. आध्यत्म म्हणजे नेमकं काय आहे याचा मुख्य गाभा जर आपल्याला समजला तर आपण इकडं तिकडं पाहण्या ऐवजी स्वतः मध्ये जास्ती जास्त काय बदल करता येतील.स्वतःला कस घडवता येईल यावर लक्ष केंद्रीत करतो.मुळ अध्यात्म समजलं तर इकडे तिकडे पळण्याची आवश्यकता भासत नाही.आपण जगभर फिरतोय आध्यत्मिक होण्यासाठी हेच आश्चर्य आहे. त्यात आणखी भर घालत इतक्यावरच न थांबता नानाविध प्रकार करत राहतो. प्रत्येकजण आप आपल्या ज्ञान बुद्धी नुसार अथाव सोयीनुसार अनेक वेगवेगळ्या पद्धतीचे उपक्रम करत असतात.त्याला नाव फक्त अध्यात्म असं गोंडस दिलं जातं. हे सगळे व्यर्थ प्रयत्न करून करून थकल्यावर सुद्धा आपण इतरांना याच मार्गाने जाण्याचा सल्ला देतो.म्हणजे किती अजब गोष्ट आहे.स्वतः मध्ये बदल करण्याची साधना अध्यात्म शिकवतो.पण आपण याला उलटं स्वीकारतो स्वतः मध्ये बदल करण्याचं बाजुला ठेवून आपण इतरांना बदलण्यासाठी प्रयत्नशील असतो.मुळात हा चुकीचा प्रयत्न असल्याने मग चुकीचा प्रयत्न यशस्वी तो कसा होईल. निसर्गातील सकारात्मक उर्जा सदैव आपल्या मध्ये साठविण्यासाठी आणि नकारात्मक शक्ती तथा नकारात्मक उर्जा या पासून स्वतःला अलिप्त ठेवण्यासाठी अध्यात्म सदैव उपयोगी ठरत असत. पण खरंया अर्थाने अध्यात्माची समज उमज आपल्याला झाली तरच आपल्याला जीवनात त्याचा सार्थक उपयोग होतो.पण खरं अध्यात्म समजण्याची आवश्यकता वाटत नाही हे वेळेचं काळच गणित आहे. अंतिमतः या मध्ये होणार नुकसान तर मानवी समुहाचे आहे.स्वतः पासुन कोणतीही सुरुवात केली तर ती उपयोगी व यशस्वी ठरतेच.अध्यात्माच पण कहिस असंच आहे.आपण स्वतः आध्यत्मिक झालो तर इतर सर्व  हळूहळू याच मार्गाने मार्गक्रमण करतील. यामध्ये शंका कुशंका अजिबात नाही.आवशकता आहे ती फक्त स्वतःला समजण्याची तसंच स्वतःपासून प्रारंभ करण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# गणेश मंदिर सभामंडप लोकार्पण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** नगर दक्षिणचे खा.डॉ. सुजय विखे यांच्या निधीतून जालिंदर कोतकर यांच्या प्रयत्नातून दूधसागर केडगाव येथील श्री गणेश मंदिराच्या सभा मंडप लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला. केडगाव परिसरामध्ये ११ मंदिराच्या सभामंडपाचे कामे मंजूर झाले असून आज पर्यंत ३ मंदिराचे सभा मंडपाचे बांधकाम चालू आहे, असे जालिंदर कोतकर यांनी सांगितले.

सचिन कोतकर यांच्या पुढाकाराने व पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक 17 मध्ये रस्ते, ड्रेनेज, सभामंडप लाईटचे प्रश्न सोडवले जात असून त्यामुळे प्रभागातील सर्वसामान्य जनतेने खासदार सुजय विखे व संदीप उद्योग समूहाचे उद्योजक सचिन कोतकर यांचे विशेष कौतुक व आभार व्यक्त केले. आजच्या या कार्यक्रमाप्रसंगी प्रभाग क्रमांक 17 चे नगरसेवक मनोज कोतकर, राहुल कांबळे, गौरीताई नन्नावरे, गणेश नन्नावरे, बाबासाहेब वायकर, सुनील उमाप, सुनील कोतकर, सोनू घेंबुड, सुमित लोंढे, भूषण गुंड, मार्केट कमिटीचे संचालक निलेश उर्फ बापू सातपुते, माजी संचालक भैरू कोतकर, ह.भ.प. नवसुपे महाराज, केडगाव सेवा सोसायटीचे चेअरमन अनिल ठुबे, भरत ठुबे, पोपटराव कराळे, अशोक कराळे, केडगाव भाजपा मंडल विभाग प्रमुख पंकज जहागीरदार, दूध सागर येथील जागृती मित्र मंडळाचे प्रवीण सुंबे, ऋषिकेश मिसाळ, नेटके, शेवाळे, किसन शिरसागर, रोडे महाराज अत्तार, चव्हाण श्री व सौ कटारिया, महेश सरोदे, सागर कराळे व केडगाव परिसरामधील सर्व मित्रपरिवार उपस्थित होते.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६८वे

नाम भगवंताचे ओठी येते ।
नाम घेता मुक्त होता येते ।
तेंव्हा दूर जाता येते ।
वासनेपासुनी हो ।। १ ।।
राम नाम "गोड नाम ।
द्यावे जिव्हेस हेच काम ।
तारक असे हो नाम । भगवंताचे ।। २।।
आपल्या भक्तांवरी प्रेम फार असे ।
आस्था, जिव्हाळा, मनी वसे ।
काळजी त्यांची असे । श्री महाराजांना ।। ३ ।।
भक्त-भाऊसाहेबाने एक केले ।
श्री महाराजांचे चरित्र लिहिले ।
लेखन-बाड फार मोठे झाले ।
भले शाबास, म्हणाले महाराज
या भक्ताला ।। ४ ।।
श्री महाराजांनी वाचून पाहिले ।
बाड ते लिहिलेले ।
लगेच फाडून टाकिले।
भाऊसाहेब म्हणे -हे हो काय केले ?
।। ५ ।। चरित्रकार संतांचा जन्मावा लागतो ।
जो नामात रंगतो-स्वत:स विसरतो। तोच चरित्र
माझे लिहू शकतो । म्हणती त्याला श्रीमहाराज
।। ६ ।। चरित्रात महत्व नसते देहाचे ।
ना चमत्काराचे । महत्व ते
भगवंताच्या अखंड अनुसंधानाचे । हेचि मर्म
असे रे, संतचरित्राचे ।। ७ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# महाराष्ट्र बँकेची खास येवला पैठणी क्लस्टर योजना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज




**येवला :** येवल्याच्या पैठणीची खरी ओळख ग्राहकांना पटावी म्हणून पैठणीवर हॉलमार्किंग किंवा क्यू-आर कोड सिस्टीम अस्तित्वात आली तर ग्राहकांना अस्सल पैठणीबाबत भ्रमणध्वनीवर तात्काळ माहिती प्राप्त होईल. यामुळे विश्वास वाढून,ग्राहकांना खरी पैठणी मिळेल,याचा उपयोग पैठणीच्या मार्केटिंगला बळकटीकरणासाठी निश्चित होईल असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्राचे जनरल मॅनेजर अरुण कबाडे यांनी येवल्यात केले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने प्रथमच विणकर कलाकार, उत्पादक, व्यापारी यांचे हितासाठी पैठणी क्लस्टर लॉंचिंग संदर्भात टाउन हॉल मीटिंगचे उत्तम आयोजन सहाराच्या हॉटेल हिरवळीवर करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर, बँक ऑफ महाराष्ट्रचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्रीराम भोर,पैठणी उद्योजक बाळासाहेब कापसे, श्रीनिवास सोनी, मंत्री ना.छगन भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक बाळासाहेब लोखंडे,उद्योगपती विनोद बनकर होते.यावेळी कबाडे यांनी खास केवळ येवलेकर पैठणी विणकारांसाठी लाभाची विशेष योजना जाहीर केली.आरबीआयच्या 22 उद्दिष्टांपैकी 20 उद्दिष्टे पूर्ण करणारी बँक म्हणून 5 लाख कोटीच्या व्यवसायाकडे वाटचाल करणारी पहिली महाराष्ट्र बँक ठरली असल्याचे गौरवोद्गार काढले. प्रास्ताविकात महाराष्ट्र बँकेचे कर्ज विभाग,मुख्य प्रबंधक युवराज पाटील यांनी क्लस्टरचा हेतू स्पष्ट केला. अतिथीच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन, बँक अधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवरांचे बँकेसह येवलेकरांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आले. क्षेत्रीय व्यवस्थापक श्रीराम भोर यांनी येवल्यात 50 विणकरांना हातमाग उपलब्ध करून देऊन अनेक विणकारांसह अन्य व्यापार क्षेत्रात तात्काळ अर्थसहाय्य दिले असून भविष्यात पैठणी क्लस्टरसह अनेक योजना देऊ केल्या असल्याचे सांगितले. पैठणी उद्योजक श्रीनिवास सोनी यांनी एक परिवार एक बँक, महाराष्ट्र बँकेचे अनुभव सांगत, सुरेल बासरी वादन करीत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी जनरल मॅनेजर अरुण कबाडे यांचे हस्ते कापसे पैठणी, संस्कृती पैठणी, मनमोहिनी पैठणी, नक्षत्र पैठणी यांना प्रतिनिधीक स्वरूपात कर्जमंजुरी पत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माजी प्राचार्य दत्ता महाले व आभार प्रदर्शन उप-क्षेत्रीय अधिकारी अमित सुतकर यांनी केले. विणकारांच्या चर्चा सत्रात प्रवीण पहिलवान,अंकुश शिरसाठ किरण भांडगे, दत्तात्रय मुंगीकर यांचेसह विणकरांना विचारलेल्या प्रश्नांना थेट बँकेचे महाव्यवस्थापक अरुण कबाडे,व क्षेत्रीय व्यवस्थापक श्रीराम भोर यांनी समाधानकारक उत्तरे दिली व ग्राहकांच्या अपेक्षा समजावून घेतल्या. पैठणी उद्योजक बाळासाहेब कापसे, बाळासाहेब लोखंडे विनोद बनकर, यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.बँकेच्या इतिहासात प्रथमच बँकेने येवल्याच्या पैठणीच्या आर्थिक स्थिरीकरणासाठी प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविल्याने मोठ्या संख्येने उपस्थित असणाऱ्या पैठणी विणकर, व्यापारी विक्रेते, उत्पादक यांनी समाधान व्यक्त केले. येवला शाखेचे मॅनेजर अविनाश सिंह, शुभम देसाई, उमाशंकर सैनी, हितेश बोंडे, पुरुषोत्तम भोरकडे. आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# डोळ्यात तिखट टाकून सराफाला लुटले

## रोख रकमेसह 27 लाखांचा मुद्देमाल केला लंपास

आधुनिक केसरी न्यूज


**यवतमाळ :** डोळ्यात मिरची पुड फेकून बंदुकीच्या धाकावर अज्ञातांनी दोन सराफ व्यापाऱ्यांना लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सराफ व्यापाऱ्यांकडून रोख रक्कमेसह 27 लाखांचा मुद्देमाल या दरोडेखोरांनी लंपास केला. ही घटना यवतमाळच्या आर्णी तालुक्यातील सदोबा सावळी येथे सोमवाच्या सायंकाळी घडली. याप्रकरणी सराफा व्यावसायिकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केली आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून रस्त्यावर लुटमारीच्या गुन्ह्याची वाढते प्रमाण आणि यापूर्वी झालेल्या गुन्ह्यांमधील आरोपींची पद्धत सारखीच असल्याने, यात कुठली टोळी सक्रिय असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत असून पोलीस त्या दिशेने या प्रकरणाचा तपास करीत आहे.



यवतमाळ जिल्ह्याच्या आर्णी येथील रहिवासी असलेले सोनार विशाल देविदास लोळगे आणि रंजित काटे यांचे सावळी सदोबा येथे गोविंद ज्वेलर्स नामक सोने-चांदी विक्रीचे दुकान आहे. त्यामुळे हे दोघे आपल्या कारने दररोज ये-जा करतात. दरम्यान, सोमवारी सायंकाळच्या सुमारास ते सदोबा सावळी येथील दुकान बंद करून दुकानातील सोन्याचांदीचे दागिने आणि रोख घेवून आर्णीकडे परत जात होते. दरम्यान, कार सावळी रोडवरील विटाची भट्टी ते कुऱ्हा फाट्यादरम्यान आली असताना काही 4 ते 5 आज्ञातांनी त्यांची टाटा नेक्सान कंपनीची कार (कार क्र. एमएच 29 बीव्ही 7128) अडवली. त्यांनतर या व्यक्तीनी कारच्या काचा फोडून त्यातील रक्कम आणि दाग दागिने हिसकावण्याचा प्रयत्न केला.

मात्र विशाल आणि रंजितने त्यांना विरोध केला असता त्यातील एकाने विशाला बंदुकीचा धाक दाखवला, तेवढ्यात दुसऱ्याने या दोघांच्या डोळ्यात मिरची पूड फेकली. भर रस्त्यात सिनेस्टाईल पद्धतीने सुरू असलेल्या या प्रकारात 4 ते 5 आज्ञातांनी कार मधील बॅग घेऊन पळ काढला. या बॅगेत 1 लाख 80 हजाराची कॅश आणि 400 ग्रॅम सोने, असा एकूण 27 लाखांचा मुद्देमाल या दरोडेखोरांनी लंपास केला.

या घटनेनंतर भयभीत झालेल्या विशाल आणि रंजितने तत्काळ पोलीस स्टेशन गाठत घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. त्यानंतर पोलिस अधीक्षक डॉ. पवन बनसोड, उपविभागीय अधिकारी रजनीकांत चिलुमुला, एलसीबीचे पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांनी तत्काळ आर्णीतील घटनास्थळाला भेट दिली. त्यानंतर पोलिसांनी पुढील कायदेशी कारवाई करत या प्रकरणाच्या पुढील तपास सुरू केला आहे. मात्र जिल्ह्यात गेल्या महिन्याभरापासून वारंवार होत असलेल्या या लूटमारच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.






# ई - सुरक्षा कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोग, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, पदव्युत्तर युनिट डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व मेटा यांच्या सहकार्याने सायबर सुरक्षा व डिजिटल सेफ्टी या विषयावरती ई -सुरक्षा कार्यक्रमाचे आयोजन ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात दिनांक 6 मार्च 2024 रोजी करण्यात आले. याप्रसंगी मेटा च्या मार्गदर्शक अश्विनी देसाई, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. नंदिता पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी तसेच ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातील प्रा. डॉ. निर्मला जाधव, प्रा. डॉ. अश्विनी मोरे यांची विचारपीठावर उपस्थिती होती.
सायबर सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करत असताना अश्विनी देसाई यांनी ऑनलाइन माध्यमातून होणारी फसवणूक व हिंसा यासंदर्भात जनजागृती पर मार्गदर्शन केले. फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हाट्सअप सेफ्टी च्या संदर्भात मार्गदर्शन तर केलेच, त्याचबरोबर प्रत्यक्ष ॲप मध्ये जाऊन सेटिंग मध्ये कशा पद्धतीने बदल करणे अपेक्षित आहे हे देखील विद्यार्थिनींना समजावून सांगितले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या काळामध्ये कोणती माहिती आपल्यासाठी महत्त्वाची आहे कोणती माहिती आपणासाठी उपयुक्त नाही व त्या पद्धतीने कोणतेही ॲप सेटिंग कशा पद्धतीने करावे या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले. त्याच बरोबर सोशल मीडिया वापरत असताना आपण कोणते कंटेंट टाकत आहोत हे समजून घेतल्याशिवाय आपण ती माहिती कधीही शेअर करता कामा नये, कारण एका अर्थाने, आपण आपल्या स्वतःच्या 'डिजिटल फुटप्रिंट' तयार करत असतो. आज सोशल मीडियात टाकलेली माहिती आपल्यासाठी भविष्यात त्रासदायक ठरू नये. यासाठी आपण विचारपूर्वक आपली माहिती भरली पाहिजे. या माध्यमांचा जपून वापर करणे महत्त्वाचे आहे असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.
या कार्यशाळेसाठी रीना वैनागडे या विद्यार्थिनीने सूत्रसंचालन केले तर डॉ. निर्मला जाधव यांनी आभार व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच प्रस्तुत कार्यक्रमात ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातील डॉ. सुकेशनी थोरात, डॉ. सविता बहिरट, तसेच श्री संजय पोळ हे देखील उपस्थित होते.

# मतदारसंघ आढावा बैठक घेऊन सर्वांना विश्वासात घेण्याचे काम : छगन भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** लोकसभा मतदारसंघानुसार कार्यकर्त्यांचे... स्थानिक नेत्यांचे... संपर्कमंत्री आणि आमचे असलेले पालकमंत्री यांचे मनोगत दोन दिवस झालेल्या आढावा बैठकीत जाणून घेण्यात आले असून या क्षणाला देखील जागा वाटपाबाबत चर्चा सुरू आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून लोकसभा मतदारसंघ आढावा बैठक घेऊन सर्वांना विश्वासात घेण्याचे काम करण्यात आले आहे. आता फायनल यादी जाहीर झाल्यावर जोमाने कामाला सुरुवात केली जाईल अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.
दिनांक ५ व ६ मार्च रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने १६ लोकसभा मतदारसंघाची आढावा बैठक महिला विकास मंडळ सभागृह मुंबई येथे पार पडली. या बैठकीत पहिल्या दिवशी नाशिक, दिंडोरी, गोंदिया - भंडारा, दक्षिण मुंबई, हिंगोली, धाराशीव, रायगड या लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला. तर दुसऱ्या दिवशी कोल्हापूर, बुलढाणा, माढा, सातारा, शिरुर, बारामती, परभणी, अहमदनगर दक्षिण, गडचिरोली या मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला. या आढावा बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, लोकसभा प्रचारप्रमुख व कृषीमंत्री धनंजय मुंडे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, मुंबई विभागीय अध्यक्ष समीर भुजबळ, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, सर्व आमदार, माजी खासदार आदींसह पक्षाच्या सेलचे प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, कार्याध्यक्ष, तालुकाध्यक्ष, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लेखिका व कवयित्री आशा डांगे यांना अण्णा भाऊ साठे वाङमय पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील लेखिका व कवयित्री




आशा डांगे यांना नागपूर येथील अण्णा भाऊ साठे साहित्य व कला अकादमी चा वाङमय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आशा डांगे यांच्या "प्रिय, हा कण गॉडपार्टीकल आहे..." या बहुचर्चित कविता संग्रहासाठी हा पुरस्कार देण्यात येणार आहे.
आशा डांगे या बळीराम पाटील विद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे "परिघाबाहेर" आणि "प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे.." हे दोन कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. त्या नेपाळ येथील भारतीय राजदुतावास आणि अक्षरयात्री विटा मार्फत घेण्यात आलेल्या विश्व साहित्य संमेलनात सहभागी झाल्या होत्या. यापूर्वी त्यांना जे. के. जाधव साहित्य पुरस्कार, पुरोगामी साहित्य संघाचा स्त्रीवादी लेखन पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य महामंडळाचा साहित्य गौरव पुरस्कार, शब्दगंध साहित्य परिषदेचा उत्कृष्ट कविता संग्रह पुरस्कार,अहिल्याबाई होळकर पुरस्कार, झेप साहित्य पुरस्कार,आदर्श शिक्षक पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले आहेत. दि 11 मार्च 2024 रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य व संस्कृती संमेलनात 97 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ रविंद्र शोभणे व जेष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य विलास सिंदगीकर, माजी आमदार राम गुंडिले, सुप्रसिद्ध विचारवंत संजयजी नाथे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल साहित्य वर्तुळ आणि वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य राजाराम राठोड, उपाध्यक्ष ॲड अभय राठोड, सचिव नितीन राठोड, कोषाध्यक्ष डॉ बिपीन राठोड त्याचबरोबर मुख्याध्यापक श्रीमंगले सर व शिक्षकांनी आशा डांगे यांचे अभिनंदन केले आहे.

# शरद पवारांबद्दल केलेले गृहमंत्र्यांचे वक्तव्य अशोभनीय : मुख्य प्रवक्ता महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज





**मुंबई :** महाराष्ट्र वाहतोय शरद पवारांचे ओझे असे वक्तव्य भाजपचे नेते तथा देशाचे गृहमंत्री अमित शाहा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पवार साहेब यांच्या बद्दल जाहीर सभेतून केले. या टिकेला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी प्रत्युत्तर देत अमित शाहा यांच्यावर चांगलाच हल्लाबोल केला आहे. देशाचे गृहमंत्री श्री अमित शहा यांचे वक्तव्य दुर्दैवी व त्यांच्या पदाला अशोभनीय असल्याची टीका महेश तपासे यांनी केली.
पवार साहेब हे देशातले एक मोठं नाव आहे आणि त्यांनी केलेल्या कार्याची माहिती कदाचित शहा साहेबांना त्यांच्या स्पीच रायटरने दिली नसावी म्हणून त्यांनी असं वक्तव्य केलं की काय असा टोला तपासे यांनी लगावला. पवार साहेबांनी महाराष्ट्राचा विकास घडवलाच त्याचबरोबर देशपातळीवर कृषी क्रांती ही घडवली याचा विसर भाजपला पडला आहे. याउलट आज देश पातळीवर शेतकऱ्यांचा मोठा आक्रोश विद्यमान मोदी सरकार बाबत आहे याची आठवण ही महेश तपासे यांनी करून दिली.
ज्या गुजरात राज्यातून देशाचे प्रधानमंत्री व गृहमंत्री येतात ते गुजरात राज्य जेव्हा भूकंपग्रस्त झालं आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक व जीवित हानी झाली त्यावेळी देश पातळीवर एकमेव नेते शरदचंद्र पवार होते ज्यांनी गुजरातच्या पुनरुभारणीचा विडा उचलण्यासाठी स्वतःहून पुढे आले आणि यशस्वीरित्या गुजरात उभ करण्याचे काम केलं. त्या काळात गुजरात मध्ये सरकार भाजपचं, केंद्रामध्ये सरकार भाजपचं तरीदेखील एक गैर भाजपाही मराठी नेता गुजरातच्या मदतीला धावून आला ही महाराष्ट्राची संस्कृती कदाचित महाराष्ट्राच्या जावयाला माहीत नसावी.
पवार साहेबांच्या ह्या कृतीचा गौरव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर झाला तसेच तत्कालीन पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी यांनी जाहीर सभेतून पवार साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे गौरव गान केले याचाही विसर कदाचित शहा साहेबांना पडला असावा. पवार साहेबांनी महाराष्ट्रा सह देशासाठी काय केले हे सर्व जनतेला सर्वश्रुत आहे. पवार साहेबांच्या कार्याची माहिती गृहमंत्र्यांना नाही हे आश्चर्यजनक असा टोला महेश तपासे यांनी लगावला.

# पांढरी खानमपूरमध्ये संचारबंदी लागू

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** पांढरी खानमपूर येथील स्वागत प्रवेशद्वाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यास गावातील एका गटाने विरोध दर्शविल्याने गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशातच बुधवारी गावातील दीडशे ते दोनशे ग्रामस्थांनी गाव सोडले असून ते पायी चालत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहेत. वाटेत आंदोलकांशी प्रशासनाचे अधिकारी चर्चा करणार आहेत. तणावाचे वातावरण लक्षात घेता, मंगळवारी रात्रीपासूनच गावात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. स्वागत कमानीचा वाद जुना आहे. पांढरी खानमपूर ग्रामपंचायतीने २६ जानेवारी २०२० रोजी प्रवेशद्वार उभारुन त्याला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार असे नाव देण्याचा ठराव ग्रामसभेत घेतला होता. परंतु याच कालावधीमध्ये करोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने प्रवेशद्वाराचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे २६ जानेवारी २०२४ रोजी पुन्हा एकदा ठराव घेऊन डॉ. प्रवेशद्वाराच्या अंमलबजावणीवर कोणीही आक्षेप घेणार नाही असाही ठराव पारीत करण्यात आला होता. तसेच खानमपूर गावामध्ये जाणाऱ्या रस्त्यावर बांधकामासाठी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय राज्य महामार्ग विभाग, अकोला यांच्याकडूनही २२ फेब्रुवारी २०२४ ला ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त देण्यात आले होते.

# मुख्यमंत्री माझी स्वच्छ सुंदर शाळा स्पर्धेत अंबिकानगर शाळा जिल्ह्यात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने राज्यभरात घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी स्वच्छ व सुंदर शाळा स्पर्धेत स्थानिक स्वराज्य संस्था शाळा गटातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिकानगर तालुका उत्तर सोलापूर ही शाळा सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाची ठरली आहे. या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील जवळपास सर्वच शाळांनी सहभाग नोंदवला होता, त्यातून हे यश शाळेने मिळवले आहे. प्रथम क्रमांक आल्याने शाळेला 11 लाख रुपयाचे बक्षीस मिळणार आहे.
जिल्हा परिषद शाळा अंबिका नगर ही सोलापूर शहर हद्दवाढ भागातील शाळा असून कांही वर्षांपूर्वी अत्यंत कठीण परिस्थितीत ही शाळा चालू होती. त्यातूनही शाळा टिकवून येथील शिक्षकांनी परिश्रमपूर्वक व नियोजनबद्ध काम करून हे यश मिळवले आहे.
मुख्यमंत्री माझी स्वच्छ सुंदर शाळा या अभियानांतर्गत शाळेत विविध प्रकारची कामे करण्यात आलेले आहेत. शाळा व वर्ग सजावट, बोलक्या भिंती, आरोग्य विषयक उपक्रम, आर्थिक साक्षरता, कौशल्य विकास, पालक व विद्यार्थी सहभाग, तंबाखूमुक्त शाळा, माजी विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन समिती सहभाग, वृक्ष लागवड, विद्यार्थी मंत्रिमंडळ, परसबाग,बाल बचत बँक, महावाचन चळवळ, विविध कलाविषयक उपक्रम, स्वच्छता मॉनिटर, राष्ट्रीय एकात्मता विषयक उपक्रम, क्रीडा स्पर्धा असे नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेने राबवले आहेत.
शाळेत सीएसआर फंडातून प्रिसिजन कंपनीच्या माध्यमातून शाळा सुशोभीकरण, पेवर ब्लॉक बसवणे, फरशीकरण, पत्रे दुरुस्ती इत्यादी कामे प्रिसिजन कंपनीच्या सीएसआर फंडातून करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर फंडातून स्वच्छतगृह उभारण्यात आले आहे.
प्रिसिजन फाउंडेशनच्या माध्यमातून सोलर पॅनल व डिजिटल क्लासरूम उभारण्यात आले आहेत.
विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये अभिजात भारतीय संगीताची ओळख व्हावी यासाठी बैठक एट स्कूल हा संगीत विषयक उपक्रम सुरू आहे. त्यातून विद्यार्थ्यांना शास्त्रोक्त गायन, वादन, नृत्यकला याविषयी माहिती दिली जाते. पासवर्ड वाचन अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची सवय लावण्यासाठी उपक्रम सुरू आहे. गीलो ऑन गो उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नाट्य अभिनयाची आवड निर्माण करण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याचबरोबर अविष्कार कार्यशाळा, प्रयोगातून विज्ञान, ई लर्निंग डिजिटल क्लासरूम, लेखन साहित्य व स्कूल बॅग वाटप, अभिनव डेस्क किट वाटप, अभ्यास मित्र उपक्रम, शैक्षणिक साहित्याचा भरपूर वापर, हरित शाळा उपक्रम आदी नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून शाळेने उठावदार कार्य केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी स्वच्छ व सुंदर शाळा स्पर्धेच्या निकषानुसार घेतलेल्या विविध उपक्रम व शाळेने केलेली अंमलबजावणी याची दखल घेत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक शाळेला जाहीर झाले आहे. या यशासाठी मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे, शाळेतील शिक्षक श्रीमती रंजना काटकर, वैशाली गोंदकर, तेजश्री ढगारे, शिवशंकर राठोड, रसिका बंदीछोडे व शिवाजी वडते यांनी परिश्रम घेतले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ. लक्ष्मी कनकधर, उपाध्यक्ष सौ. कल्पना आडगळे व सर्व सदस्य यांनी यासाठी सहकार्य केले. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निम्बर्गी, गटविकास अधिकारी महेश पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथ.) कादर शेख व उपशिक्षणाधिकारी संजय जावीर व शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार यांनी शाळेतील विद्यार्थी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांचे अभिनंदन केले आहे.



# जागतिक महिला दिनानिमित्त कृषी विभाग, आत्मा यंत्रणा यांचे मार्फत कंकराळा येथील शेतकरी गटाला मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** ०६ रोजी मौजे कंकराळा ता. सोयगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने गावातील आत्मा अंतर्गत नोंदणी झालेल्या बचत गटाच्या महिला यांचा समावेश होता. आजचा कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया व मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्या मार्गदर्शनाखाली व मंडळ कृषी अधिकारी बनोटी संपत वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला होता.

आजच्या कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी बनोटी संपत वाघ यांनी कृषी विभागाच्या योजना व मिळणारे लाभ याबाबत मार्गदर्शन केले. चिफ मॅनेजर पारादीप फॅास्फेट लिमिटेड तुषार शिंत्रे यांनी रासायनिक खतांचा वापर व मृदा नमुना कसा घ्यावा याविषयी माहिती दिली. तसेच अजय हिवाळे यांनी जमीन सुपीकता नुसार रासायनिक खतांचा वापर याविषयी माहिती दिली. ए.एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना याविषयीची माहिती दिली तसेच योजनेसाठी लागणारी कागदपत्रे याविषयी सांगितले.

आजच्या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच किशोर सोनवणे, युवा नेते तसेच गावाचे उपसरपंच कुणाल राजपूत, ग्रामपंचायत सदस्य श्याम पाटील, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय उबाळे, ग्रामपंचायत सदस्या रत्नाबाई ढाकरे, ग्रामपंचायत सदस्या सारीका हिवराळे, ग्रामपंचायत सदस्या निर्मला



सोनावणे, ग्रामपंचायत सदस्य गोरख पवार, विजया ढाकरे पोलीस पाटील तसेच अध्यक्ष व सचिव उन्नती महिला शेतकरी गट, प्रगती महिला शेतकरी गट व कृषी वसंत महिला शेतकरी गट आणि सर्व गटातील सदस्य, तसेच प्रगतीशील महिला शेतकरी यांची उपस्थिती होती.

## आता मिळणार ई- शिधापत्रिका; रेशन कार्ड साठी नागरिकांनी ऑनलाईन अर्ज करावेत

आधुनिक केसरी न्यूज



**कोपरगाव :** तालुक्यातील सर्व नागरिकांना नवीन शिधापत्रिका काढण्यासाठी तसेच शिधापत्रिकेत नाव समाविष्ट करणे, नावे कमी करणे यासाठी पुरवठा विभागाकडून ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार संदीपकुमार भोसले यांनी दिली आहे.

शिधापत्रिकेसंदर्भातील कामाकरता नागरिकांना तहसील कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागत होते. त्यामुळे पुरवठा विभागामध्ये नेहमीच नागरिकांची धावपळ व गर्दी होत असे आणि त्यामुळे अनेक वेळेला वादावादीचे प्रसंग उद्भवत असतात आणि त्याचा परिणाम पुरवठा विभागाच्या कामकाजवळ होऊन ते कामकाज अतिशय संथगतीने होत होत होते. त्यातच सर्वर डाऊन असणे, वेबसाईट हळू चालणे अशा समस्या येत असल्यामुळे या कामात व्यत्यय येऊन नागरिकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागत होता. त्यामुळे तहसील कार्यालयाकडून ई शिधापत्रिका या संकल्पनेमुळे त्याचा नागरिकांना निश्चितच फायदा होईल व पर्यायाने नागरिकांचे हेलपाटे कमी होऊन वेळ व पैशाचा अपव्यय कमी होणार असल्यामुळे ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे मत तहसीलदार संदीप कुमार भोसले यांनी व्यक्त केले.

नवीन शिधापत्रिका संदर्भातील कोणत्याही कामासाठी आता नागरिकांना प्रत्यक्ष तहसील कार्यालयात येण्याची गरज राहिलेली नाही.पुरवठा विभागाकडून ई - शिधापत्रिका देण्यात येणार आहेत.नागरिकांनी गुगल या संकेत स्थळावर जावून HTTPS://RCMS.MAHAFOOD.GOV.IN या संकेत स्थळाला भेट द्यावी व पब्लिक लॉगिन यावर क्लिक करून आपले रजिस्ट्रेशन करून घ्यावे.याबाबत सर्व सेतू चालकांना माहिती देण्यात आली असून नागरिक आपल्या कामासाठी ई.सेवा केंद्र (सेतू)यांच्याशी संपर्क करू शकतात. रेशनकार्ड संदर्भात पूर्ण माहिती ऑनलाईन भरल्यानंतर तसेच संबधित पुरावे अपलोड केल्यानंतर तहसील कार्यालयाकडून मंजुरी देण्यात येणार आहे.त्यानंतर डिजिटल सहीचे ई.रेशन कार्ड मिळणार आहे.

त्यामुळे आता नागरिकांनी तहसील कार्यालयात गर्दी न करता रेशन कार्ड संदर्भातील कामासाठी ऑनलाईन अर्ज करावे असे आवाहन तहसीलदार संदीप कुमार भोसले यांनी केले आहे.

## फुलंब्री-खुलताबाद महामार्ग ते देवळाना-टाकळी रस्ता काम प्रगतीपथावर

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** फुलंब्री -खुलताबाद राज्य महामार्ग ७५२ ते देवळाना बु,देवळाना खु, हरिजन वस्ती,टाकळी राजेराय बाजार सावंगी मुख्य रस्तामातीकरण खडीकरण डांबरीकरण सिमेंटीकरण पुल कामांना वेग आला आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून हे काम होत असुण कामाची रक्कम ३०५.४१लक्ष रुपये आहे.तर ४.८०० लांबीचा रस्ता यात पुल चार,४००मिटर सिमेंटी रस्ता पाच वर्षाची देखभाल दुरुस्ती यास १६.०८लक्ष रुपये ठेवण्यात आले आहे.प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था प्रकल्प अर्थसहाय्य महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग एडीबीचे आहे. (सन -२०२३-२०२४) काम पूर्ण होण्याची तारीख मुददत १६ मे २०२४आहे.तर त्यासाठी सद्या गुत्तेदार करवी कामांना वेग आले आहे.टाकळी राजेराय -बाजारसावंगी मुख्य रस्ता ते हरिजन वस्ती, देवळांना बु,देवळाना खु, फुलंब्री -खुलताबाद ७५२ मुख्य रस्ता पर्यंत रस्ता पुल काम व्हावे म्हणून नागरिक सतत पाठपुरावा मागणी धरुन होते आखेर पंतप्रधान सडक योजनेतून या कामाला मुहूर्त मिळाला व सद्या हे काम प्रगतीपथावर असल्याचे चित्र आहे.हे विशेष.या रस्ता व पुल कामामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.काम प्रगतीपथावर असल्याचे चित्र आहे.



## सोयगाव येथे महावितरणच्या जनमित्रांचा गौरव; लाईनमन दिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जनमित्रांचायत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महावितरण सोयगाव महावितरण कार्यालयाच्या वतीने सोमवारी दि.४/३/२०२४ रोजी लाईनमन दिवस मोठ्या उत्साहात उपकार्यकारी अभियंता निरज बिदे याच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी जनमित्रांचा गौरव करण्याबरोबरच विद्युत सुरक्षेची शपथ देण्यात आली. महापारेषणच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केले होते. मंचावर अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी, प्रवीण दरोली, प्रेमसिंग राजपूत (प्रभारी) यांचीही उपस्थिती होती. यावेळी उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांनी सावळदबारा येथील ज्ञानेश्वर घोडके, अशोक आरके, वैभव ठाकूर,अमित आडसुळ, समीर पहिलवान यांना लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा देऊन जनमित्रांच्या सर्व अडचणी सोडवण्याचे आश्वासन अभियंता बिदे यांनी दिले. तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक जनमित्र उत्कृष्ट ग्राहकसेवा देत आहेत. याबरोबरच सर्वांनी वीज हानी व वीजबिल थकबाकी कमी करण्यासाठीही प्रयत्न करावेत. असे कनिष्ठ अभियंता सावळदबारा येथील शेख म्हणाले की, ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता ग्राहकांना चंगली सेवा देण्यासाठी जनमित्र रात्रंदिवस काम करत असतात. त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. तथापि, वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे कंपनीसमोर आर्थिक आव्हान आहे. त्यासाठी सवांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे गरज आहे. अतिरिक्त कार्यकारी अभियंता व्यंकटेश पेन्सलवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत जनमित्रांचे प्रबोधन केले. जनमित्रांच्या वतीने अभियंता पठाण यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक उपविभागातील एका जनमित्राचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यात ज्ञानेश्वर घोडके, अशोक आरके, वैभव ठाकूर, अमित आडसुळ, व समीर पहिलवान यांचा समावेश आहे. उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांनी लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा देऊन जनमित्रांच्या कामाचा गौरव करुन त्यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.यांच्यासह सोयगाव शहर व सावळदबारा, फर्दापूर,जरंडी व बनोटी ग्रामीण मंडलातील अभियंते व जनमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भोकर बाजारपेठेत मालाची आवक घटली

### खासगी व्यापाऱ्यांची चांदी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील बाजारपेठेत प्रारंभी शेतक-याची तोबा गर्दी असायची आता मात्र नियमीत चार ते पाच क्विंटल माल येतो आहे. शहरात लगत खासगी व्यापाऱ्यांनी खरेदी सुरू केल्याने बाजार पेठेतील मालाची आवक घटली आहे.याचा मोठा फटाका बाजार समितीला बसतो आहे. तालूक्याच्या लगतच तेलगंणा सिमा असल्याने तेथील आणि विदर्भासह तालुक्याचा माल येथील बाजार पेठेत मोठ्या प्रमाणात येत होता त्यामुळे बाजारपेठ नेहमी गजबजून असायची. शेतक-याची गैरसोय होणार नाही याची दक्षता बाजार समितीकडून घेतली जात असे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेवून बाजारपेठेत विविध विकासकामे करण्यात आली आहेत.पुर्वी शेतकऱ्यांचा माल उघड्यावर असायचा आता मालासाठी स्वतंत्र शेड उभारणी करण्यात आली आहे.सदरील शेड मध्ये माल कमी आणि खासगी चारचाकी वाहने थांबवीले जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याबाबत कुणीच ब्र शब्द काढित नाही.


**खासगी व्यापाऱ्याचा नफा :** येथील बाजार समितीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असुन शहराबाहेर असलेल्या खासगी व्यापाऱ्यांकडे जाणं पसंत करीत आहेत .खासगी व्यापारी जमा झालेला एकगठ्ठा माल वाहतूक करतो आहे ते बाजार समिती करू शकत नाही या फरकामुळे बाजार समिती सध्यातरी तोट्यात आल्याचे समजते .

**दरात तफावत नाही :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि खासगी व्यापारी एकाच दरात माल खरेदी करीत आहेत .गहू( १,९५० ते२,६३५ रूपये क्विंटल),हरभरा( ५००० ते७,५५० ),तूर( ८००० ते९,४५० ),हळद( ९००० ते १०,००० ) दरत खरेदी सुरू आहे अशी माहिती बाजार समितीचे सचिव प्रदीप सुर्यवंशी यांनी दिली आहे .

## खा. नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** खासदार नवनीत राणा यांना पुन्हा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. राणा यांना व्हॉटसअपवर एक क्लिप पाठवून ही धमकी देण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार ही धमकी पाकिस्तान अथवा अफगाणिस्तान येथून देण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रकरणी नवनीत राणा यांचे स्वीय साहाय्यक विनोद गुहे यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात या विषयी माहिती देत तक्रार दाखल केली आहे. तर पोलिसांनी या प्रकरणी धमकी देणाऱ्या अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या पूर्वीदेखील असाच प्रकार खासदार नवनीत राणा यांच्यासोबत घडला होता. यात धमकी देण्याऱ्याला पोलिसांनी अटक देखील केली होती. मात्र, पुन्हा असाच प्रकार घडल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. तर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून धमकी देणाऱ्याचा शोध सध्या घेतला जात आहे. खासदार नवनीत राणा यांना गेल्या काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकारे



धमकीचे फोन येत असल्याची माहिती पुढे आली होती. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी तपासातून श्याम तायवाडे या व्यक्तीला अटक करत त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या. तेव्हा या तरुणाने आपल्या वडिलांच्या नावावर असलेल्या सिमकार्डचा वापर करत कॉलवर अश्लील शिवीगाळ केली होती. त्यावेळी पोलिसांनी त्याला अमरावतीतील नेरपिंगळाई या ठिकाणाहून अटक केली होती. मात्र, आता आलेला धमकीचा फोन हा पाकिस्तान आणि अफगाणिस्तानावरुन असल्याची प्राथमिक माहिती पुढे आल्याने, पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तत्काळ गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात कलम 354 A, 354 D, 506 (2), 67 नुसार गुन्हे दाखल केला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत धमकी देण्याऱ्याचा शोध घेत आहे.



# धुळे शासकीय विद्यानिकेतनला पुरस्कार; माजी विद्यार्थ्यांना आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा "या अभियानात धुळे येथील शासकीय विद्यानिकेतनला पुरस्कार प्राप्त झाल्याने राज्यभरातील व देश,परदेशातील विविध क्षेत्रातील माजी विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. आमच्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे अशी भावना या सर्व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने पहिल्यांदाच हे अभिनव अभियान राबविण्यात आले. विशेष बाब अशी की या अभियानात विक्रमी संख्येने शाळांनी सहभाग नोंदविला. 64 हजार 312 शासकीय आणि 39 हजार खाजगी अशा एक लाख तीन हजार तीनशे बारा शाळा या स्पर्धात्मक अभियानात सहभागी झाल्या. या माध्यमातून एक कोटी चार लाख 64 हजार विद्यार्थी आणि 94 लाख 97 हजार 166 विद्यार्थिनी एकूण दोन कोटी पेक्षाही अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी अभियानात सहभाग नोंदवला. अशा विक्रमी सहभागातून निर्माण झालेल्या तीव्र स्पर्धेत आपल्या शाळेला पुरस्कार लाभला याचा विशेष आनंद माजी विद्यार्थ्यांमध्ये आहे.

मुंबईत नुकताच मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री नामदार दीपक केसरकर,प्रधान सचिव रणजितसिंह देवल,शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्यासारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. शाळेच्या प्राचार्या डॉ मंजुषा क्षीरसागर, रेक्टर प्रतिभा ठाकूर,लिपिक सुनील सोनवणे व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला. हा पुरस्कार देताना शाळांमध्ये विद्यार्थी गुणसंवर्धनासाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम तसेच शाळांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने केलेले काम, विज बचत, डिजिटल उपकरणांचा वापर, वैज्ञानिक दृष्टिकोन,लोकशाही मूल्यांचा वापर, परसबाग, वृक्षसंवर्धन, मूल्य संस्कार,स्वच्छतेच्या सवयी अशा वेगवेगळ्या गोष्टींचा विचार करण्यात आला.

मधुकरराव चौधरी राज्याचे शिक्षणमंत्री असताना 1965 मध्ये राज्यातील ग्रामीण भागातील गरीब परंतु हुशार विध्यार्थ्यांसाठी विभागवार चार शासकीय विद्यानिकेतनांची स्थापना करण्यात आली होती. हा प्रयोग अत्यंत यशस्वी झाला. या शाळांमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात देशात आणि परदेशात नाव कमावले आणि या शाळेचे नाव मोठे केले आणि समाजात व देशात आपला नावलौकिक वाढविला परंतु काळाच्या ओघात शासनाचे दुर्लक्ष झाल्याने खासगी शाळांची संख्या भरमसाठ वाढल्याने शाळेची वैभवशाली परंपरा खंडित होऊन तिची दुरावस्था झाली. सर्वच बाबतीत झालेली आपल्या माय माऊलीची ही दुरावस्था पाहून माजी विद्यार्थी अस्वस्थ झाले आणि या माऊलीसाठी काहीतरी करायला हवे या भावनेतून डॉ चंद्रकांत तेलतुंबडे यांच्यासारख्या माजी विद्यार्थ्यांनी गिव्ह बॅक फाउंडेशन ची स्थापना केली. सर्वांच्या प्रयत्नांनी शासकीय स्तरावरून व वैयक्तिकरित्या मदतीचा ओघ सुरू झाला आणि या मातेला गतवैभव प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांना वेग आला. माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात प्राप्त झालेल्या पुरस्कार म्हणजे या शाळेतील सध्याचा शिक्षक वृंद व कर्मचारी आणि माजी विद्यार्थी यांच्या संयुक्त प्रेरणाला मिळालेला पुरस्कारच आहे. शाळेचा गौरव वाढविण्याचे हे प्रयत्न असेच भविष्यातही अखंडपणे चालू राहतील असा विडा सर्व माजी विद्यार्थ्यांनी उचलला आहे.

# सकल मराठा समाजाकडून लोकसभेसाठी उमेदवार जाहीर

## कळंब तालुक्यातील जवळा (खुर्द) येथील तुषार पवार यांना लोकसभेची उमेदवारी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत बरकते**

**कळंब :** तालुक्यांतील जवळा खुर्द येथे सकल मराठा समजाकडून बैठक घेण्यात आली. राज्य शासनाने सगेसोयरे च्या अध्यादेश काढणे व मनोज जरांगे पाटील यांना समर्थन दर्शवत पुढील आंदोलनाचा आढावा घेण्यात आला. तसेच प्रामुख्याने आगामी लोकसभेसाठी मराठा समाजाने प्रत्येक गावातून एक उमेदवार अशी तयारी केली आहे. त्यातूनच जवळा (खुर्द) येथे झालेल्या बैठकीत मराठा समाजाने कळंब तालुक्यातील 94 गावात 94 उमेदवार उभे करण्याचे आवाहन केले आहे.



विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर जवळा खुर्द गावातूनच सुरूवात करत लोक सभेसाठी तुषार पवार यांची निवड करण्यात आली आहे. सरकारने सगे सोयाऱ्याना आरक्षण देऊन मराठा समाजाला न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली.10 टक्के आरक्षण मराठा समाजाला मान्य नसल्याचे जाहीर करत लोकसभा उमेदवार तुषार पवार यांच्या पाठीशी गावकऱ्यांनी ताकतीने ऊभे राहण्याचे ठरविण्यात आले आहे.



# आ. डॉ. बालाजी किणीकर यांच्या हस्ते छाया रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटरचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** शहरातील गोर गरीब गरजू जनतेचे आरोग्य जपणाऱ्या कै.बी.जी. छाया रुग्णालय येथे गरोदर माता, मुतखडा,तसेच पोटा संदर्भात चाचणी व तपासणी करण्याकरिता सोनोग्राफी सेंटरचे उद्घाटन आमदार डॉ बालाजी किणीकर व महिला रुग्ण सौ. अबीदा बेहेन यांच्या हस्ते उदघाटन करून नागरिकांच्या सेवेसाठी निशुल्करित्या सुरु करण्यात आले आहे. यावेळी मा. नगराध्यक्ष सुनिल चौधरी, सौ. प्रज्ञा बनसोडे, उपशाखाप्रमुख गणेश कोतेकर मा. नगरसेवक सुभाष साळुंके, लेनिन मुक्कू, रविंद्र पाटील, रविंद्र करंजुले,उपविभाग प्रमुख आबा महाजन, शिवसैनिक विकास सोमेश्वर,हमीद भाई,युवासेना शहर अधिकारी राहुल सोमेश्वर महिला आघाडीच्या सौ. विद्या जाधव, डॉ. विद्या सातपुते,तसेच छाया हॉस्पिटलचे डॉ.सकपाळ साहेब सह वैद्यकीय परिचारिका उपस्थिती होत्या. याप्रसंगी महिला वॉर्डची पाहणी करुन कोणत्याच सुविधेने आपले नागरिक वंचित न राहावे असे आदेश प्रशासनाला आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी यावेळी दिले.




# श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयांतील दिलीप कुडके यांना मराठी अध्यापन सेवा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** येथील श्रीमान गोकुळचंदजी विदयालयातील दिलीप कुडके यांना,' मराठी भाषा गौरव दिना' निमित्तानं मराठी ग्रामीण साहित्य संमेलानात राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. ज्ञानज्योती बहुउदृशीय संस्थेच्या वतीने मराठी भाषेची निगडित सेवा प्रसार व संशोधनकार्याच्या अनमोल योगदाना बद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. दिलीप कुडके हे विदयालयात क्रीडा शिक्षक म्हणून देखिल कार्यरत असुन त्यांनी स्काऊट आणि गाईड मध्ये देखिल लक्षवेधी काम केले आहे.त्यांच्या या यशा बद्दल कोपरगांव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कैलास ठोळे सचिव दिलीप अजमेरे, स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन चंद्रकांत ठोळे,सहसचिव सचिनअजमेरे, संदीपअजमेरे, डा.अमोल अजमेरे,राजेश ठोळे, आनंद ठोळे, मुख्याध्यापक मकरंद को-हाळकर, उपमुख्याध्यापक रमेश गायकवाड, पर्यवेक्षक उमा रायते, विदयालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदिनी अभिनंदन केले आहे. दरम्यान या पुरस्काराने आपल्याला प्रेरणा मिळाली असुन मराठी भाषेसाठी चांगले कार्य करण्याची संधी मिळाली आहे असे दिलीप कुडके यांनी स्पष्ट केले आहे.



# धुळे लोकसभा स्वबळावर लढवणार: सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकसभा निवडणूक स्वबळावर लढविण्याची घोषणा एकलव्य आदिवासी युवा संघटनेचे संस्थापक तथा प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे यांनी धुळ्यात संघटनेच्या आढावा बैठकीतून केली आहे. आगामी निवडणुकांमध्ये आदिवासी समाजाचे नेतृत्व करणाऱ्या आदिवासी संघटनांना विचारात घेतले जात नसेल , संघटनांना डावललं जात असेल तर आगामी निवडणुकांमध्ये एकलव्य आदिवासी युवा संघटना धुळे लोकसभेसाठी स्वतंत्र उमेदवार रिंगणात उतरवेल, असा इशारा ही इतर पक्षांना एकलव्य आदिवासी युवा संघटनेचे संस्थापक तथा प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे यांनी दिला आहेत. धुळ्यातील साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळ कार्यालयात आयोजित संघटनेच्या बैठकीत ते बोलत होते. त्याचबरोबर त्यांनी भाजप काँग्रेसवर टीकेची झोड उठविली आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जाती धर्माच्या संघटनेच्या नेत्यांना विचारात घेऊन निवडणुकीचा आराखडा आखला जात आहे.. मात्र धुळ्यात आदिवासी समाजाची संख्या ही मोठ्या प्रमाणात असूनही आदिवासी समाजाच्या संघटनेच्या नेत्यांना विचारात घेतलं जात नाही, एक प्रकारे आदिवासी समाजाला केवळ मतांसाठी ठेवून डावललं जात आहे. त्यामुळे समाजाचे नेतृत्व करणाऱ्या आदिवासी संघटनांचा विचार येत्या आगामी निवडणुकामध्ये होत नसेल तर धुळे लोकसभेसाठी स्वतंत्र निवडणूक लढवू असा इशारा एकलव्य आदिवासी युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे यांनी दिला आहेत. मागील साक्री विधानसभेच्या निवडणुकीत राजकुमार सोनवणे हे निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेस आणि भाजपाला मतांचा मोठा फटका ही बसला होता. याचा फायदा अपक्ष निवडणूक लढवणाऱ्या विद्यमान आमदार मंजुळा गावित यांना झाला होता. त्यामुळे आदिवासी समाजाच्या संघटनेने आगामी निवडणुका लढवण्याचा विचार केला तर याचा नक्कीच फटका इतर पक्षांना बसल्याशिवाय राहणार नाही असे ही बोललं जात आहेत. एकलव्य आदिवासी युवा संघटनेने आयोजित केलेल्या आढावा बैठकीत काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना संघटनेची जबाबदारी देण्यात आली आहे. एकलव्य आदिवासी युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सोनवणे, ॲड. प्रवीण मोरे, अंबर मालचे, दिलीप मोरे, संपद सोनवणे, अंकुश सोनवणे, प्रकाश भिल, समाधान सोनवणे,ज्ञानेश्वर मालचे, गुलाब भिल,उमेश मोरे, अजय भिल, अजय गायकवाड यांसह आधी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्याध्यापकास मारहाण; आरोपीस कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** दोन शाळकरी मुलांमध्ये झालेल्या वादात मुलांना समज दिल्याच्या कारणावरून चिखलीतील एका शाळेच्या मुख्याध्यापकास २०१८ मध्ये बेदम मारहाण केली होती. या आरोपीस बुलढाणा प्रमुख व जिल्हा न्यायालयाने एक वर्ष सश्रम करावास व दोन हजार दंडाची शिक्षा सुनावली. शेख आहात उर्फ शेख शौकत शेख अहमद असे आरोपीचे नाव आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ एस बी डीगे यांनी हा निकाल दिला. चिखली येथील तक्षशिला माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये ८ ऑगस्ट २०१८ रोजी ही घटना घडली होती. दोन विद्यार्थ्यांमध्ये वाद झाला होता. एका शिक्षकाने मध्यस्थी करून मुख्याध्यापक सुनील वळसे यांना कल्पना दिली होती. भांडण करणाऱ्या एका मुलाने त्याच्या घरी घडलेला प्रकार सांगितला. त्याचे वडील शेख आहात उर्फ शौकत शेख अहमद यांच्यासह शेख जहीर रशीद अहमद, मो. आवेज बागवान, शेख सकलेन शेख सलीम, शेख शाकीर शेख साबीर हे शाळेमध्ये गेले. दहाव्या वर्गात इंग्रजी विषय शिकवत असलेल्या मुख्याध्यापक वळसे यांना त्यांनी बेदम मारहाण केली.

या प्रकरणी पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकून जिल्हा व सत्र न्यायाधीश (२) एस. बी. डिगे यांनी आरोपी शेख आहात उर्फ शेख शौकत शेख अहमद यास एक वर्ष सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावास यासह अन्य कलमान्वयेही शिक्षा सुनावली आहे.

# ऊन पडण्यास सुरुवात, हिवाळा संपला

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** हिवाळा कधी संपला कळालेच नाही व आता कडक उन्ह उकडा सुरु झाल्याचे चित्र आहे. हिवाळ्यात आभाळी वातावरण अधूनमधून बेमौसमी पाऊस वारा वादळ एकुण हिवाळा -पावसाळा संयुक्तपणे सुरू होता. हिवाळा म्हणून वाटलेच नाही. तर फेब्रुवारी संपताच व मार्च सुरु होताच उन्हाने आपले रंग दाखविण्यास सुरुवात केली असुण मार्चच्या पहिल्या आठवड्यातच कडक उन्ह पडु लागले आहे तर उकडा जाणवु लागला आहे.सुरुवातीलाच उन्ह इतके कडक पडत आहे की अंगाची लाही लाही होत असल्याचे चित्र आहे.तर सकाळीच दहा अकरा वाजता उन्ह आपला करिष्मा दाखवत आहे.मे महिना अद्याप बाकी आहे तर त्याची कल्पनाच करने नको, असे चित्र सद्या इकडे गाव परिसरात आहे.

# पूरग्रस्तांच्या न्यायासाठी वंचितचे आंदोलन


आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जा) :** २२ जुलै २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे दुकानाची व घरांची पडझड मोठ्या प्रमाणात झाली होती. परंतु आज आठ महिने उलटूनही कोणत्याही प्रकारची सानुग्रह मदत नुकसानग्रस्त दुकानदारांना व घरांची पडझड झालेल्या नागरिकांना भरीव मिळालेली नाही महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा एकनाथ शिंदे यांनी नुकसानग्रस्त दुकानदारांना ५०००० रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे परंतु अद्यापही नुकसानग्रस्त दुकानदारांना मदत मिळालेली नाही. हा सरासर अन्याय या नुकसानग्रस्त नागरिकांवर होत आहे. म्हणून आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसिल कार्यालय जळगांव (जामोद) येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले सदर आंदोलन हे पुरग्रस्तांच्या विविध मागण्या घेऊन करण्यात आले होते या आंदोलनात 22जुलै 2023रोजी झालेल्या ढगफुटीमुळे तालुक्यातील अनेक गावातील घरांची पडझड झाली होती. त्याची आर्थिक मदत गेल्या 8 महिन्यांपासून मिळालेली नाही, ती तत्काळ मिळावी, अनेक गावातील लहान मोठे उद्योग व्यवसाय करणारे दुकानदारांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्यावरही कुठलीच मदत शासनाने आजपर्यंत जाहीर केल्यावरही दिली नाही ती मदत तत्काळ मिळावी. ढगफुटीमुळे पुर्णतः घरांची पडझड झालेल्याना घरकुल योजनेचा लाभ तात्काळ द्यावा, २६ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेती पिकांचा हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या.
या मागण्या घेऊन दिनांक ०५ /०३/२०२३ रोजी तहसिल कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सर्व नुकसानग्रस्त दुकानदार, घरांची पडझड झालेल्या नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात आले होते. तसेच या धरणे आंदोलनाला जळगांव जामोद तालुक्यातील नुकसानग्रस्त व्यावसायिक दुकानदारांनी पाठिंबा दिला या धरणे आंदोलनात वंचित बहुजन आघाडिचे जिल्हा महासचिव अनिल इखारे, जिल्हा संघटक अरुणभाऊ पारवे, माजी तालुका अध्यक्ष रतन नाईक, युवा नेते विजय पोहनकर, प्रकाश भिसे, तालुका उपाध्यक्ष सुनिल बोदडे, तालुका महासचिव विजय सातव, जेष्ठ नेते ईज्जत बेग ,तालुका उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, संचालक प्रशांत अवसरमोल,महिला आघाडीच्या पार्वताबाई इंगळे,सुनिता हेलोडे, मंगलाताई पारवे, अमोल दाभाडे ,आनंदा गवई,विजय पारवे,गजानन चोखंडे,संतोष पवार, रमेश बैरागी, दुर्योधन मांडोकार, मंगेश खंडारे, गुलाबराव आठवले, सोपान वाघोदे,भास्कर भगत, विजय तायडे, कैलास भगत, नारायण पारवे,यांच्या सह पुरग्रस्त दुकानदार, टपरीधारक , शेतकरी व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# साहेबराव आसराजी काटकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ताः खुलताबाद) येथील ज्येष्ठ



शेतकरी साहेबराव आसराजी काटकर (वय ६५ वर्ष) यांचे मंगळवारी (ता:५) सकाळी दहाच्या दरम्यान हृदयविकाराने निधन झाले.
त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले दोन मुली असा परिवार असून पोलीस प्रशासनाच्या जमादारपदी कार्यरत असलेल्या संदीप काटकर व साईनाथ काटकर यांचे ते वडील होत. सायंकाळी त्यांच्या शेत वस्तीवरील शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रणजीत राजे यांनी घडवला बारामती दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष श्री रणजीत राजे भोसले यांनी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा बारामती दौरा पाहणी व आदरणीय शरदचंद्र पवार यांची भेट घडून आणली. पक्षाची सत्ता गेल्यानंतर तसेच पक्षातील बंडोखरी नंतर सुद्धा पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या निष्ठेने शरद पवार साहेबांच्या विचाराने काम करीत आहेत. शरद पवारांचे विचार, बारामती मधील त्यांचे काम हे सर्वांसाठी स्फूर्तीदायक आहेत.हाच विचार करून रणजीत राजे भोसले यांनी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांची बारामती पाहणी दौरा आयोजित केला होता. लोकसभेच्या पार्श्वभूमीवर एवढा व्यस्त कार्यक्रम असताना सुद्धा शरद पवार साहेबांनी धुळे जिल्ह्यातील सर्वांना एक ते दीड तासाचा वेळ दिला.बारामती लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांची गर्दी असताना शरद पवार साहेबांनी धुळ्यातील कार्यकर्त्यांशी हितगुज साधली. धुळ्यातील कार्यकर्त्यांची भेट आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांनी बारामती येथील "गोविंद बाग" या निवासस्थानी घेतली. शरद पवारांनी धुळ्यातील कार्यकर्त्यांना त्यांची मनोगत मांडण्यास सांगून त्यांची भावना जाणून घेतली. यावेळी नंदू यलमामे, दीपक देवरे,अमित शेख, दीपक बैसाने, संदीप पाटील,कल्पेश मगर,दिलीप पाटील यांनी साहेबांसमोर मनोगत व्यक्त केले. कार्यकर्त्यांनी धुळ्याची परिस्थिती व पक्षाचे काम यांची मांडणी साहेबांसमोर केली. रणजीत राजे भोसले यांनी माहिती देताना सांगितले की,येथे आलेले कार्यकर्ते हे विविध जाती धर्माचे, विविध क्षेत्राचे तसेच विविध परिसरातून आलेले आहेत. हे सर्व कार्यकर्ते शिव -फुले- शाहू- आंबेडकर विचारधारेवर चालणारे आहेत.तसेच आपल्या पाठीमागे भक्कमपणे उभे आहेत. त्यानंतर शरद पवार साहेबांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. शरद पवार म्हणाले की, देशात आज हुकूमशाही पद्धतीचे कारभार केला जात आहे. पूर्वी नेते पक्ष सोडून जात असे,,पण आता मनमानी पद्धतीने लोकशाहीत तुडवत एकाचा पक्ष दुसऱ्याला दिला जात आहे.देशाची परिस्थिती बघता सर्व कार्यकर्त्यांनी एकजूट होऊन संघर्ष केला पाहिजे. सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना सर्व गोष्टी अवगत करणे गरजेचे आहे. हुकूमशाही,दडपशाही जास्त दिवस टिकणार नाही आहे.जोराने कामाला लागा. पुढील दिवस आपले आहेत. शहराचे अध्यक्ष व तुमचे काम चांगले आहे. लोकांमध्ये जाऊन आपले विचार मांडा असे शरद पवार साहेब यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. विशेषता शरद पवार साहेबांनी धुळ्यातील कार्यकर्त्यांना बारामती व तेथील कामे बघण्यासाठी स्वतः फोन लावून काही लोकांना जबाबदारी दिली, धुळ्यातील कार्यकर्त्यांनी रंजीत राजे भोसले सह बारामती येथील प्रगतशील, अद्यावत तंत्रज्ञान सह केली जाणारी शेती पाहिली. बारामती मधील कृषी विज्ञान केंद्राला भेट दिली. तेथील फळबागा, फुल, मच्छशेती, शेततळे, पप्रयोगशाळा, शेतकरी निवासस्थान आदींची पाहणी केली. त्यानंतर बारामती येथील जागतिक पातळीची डेअरी फॉर्मला भेट दिली. डेअरी फॉर्म येथील विविध जातीच्या गाई म्हशी, नवीन तंत्रज्ञान,जनावरांचे आरोग्य तपासणी टेक्नॉलॉजी, देशातील प्रसिद्ध लॅब याची पाहणी करून तेथील अधिकाऱ्याने संपूर्ण माहिती कार्यकर्त्यांना दिली. तसेच बारामती शहरातील कृषी महाविद्यालय,इनोव्हेशन सेंटर,आधुनिक हॉल यांना भेट देऊन पाणी केले. यावेळी तेथील अधिकाऱ्यांनी एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या मार्फत 1971 ते 2023 पर्यंत केल्या गेलेल्या विविध कामांची माहिती एका डॉक्युमेंटरी फिल्म दाखवून दिली. शरद पवार साहेबांनी 1968 साली केलेल्या फूड फॉर अंगर कामाची माहिती यावेळी देण्यात आली.
हे संग्रहालयाची पाहताना त्यांच्या 84 वर्षाचा रोमांचक,संघर्षमय जीवनपट आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. या दौऱ्यामध्ये गोरख शर्मा,अमित शेख, अशोक धुळकर, राजू डॉमेड, डी. टी. पाटील, नंदू येलममे,शशी काटे,आसिफ शेख, बरकत शाह, भाग्येश मोरे, भटू पाटील, भिका नेरकर, भूषण पाटील, दत्तू पाटील, दिलीप पाटील, दीपक बैसाणे, दीपक देवरे, राजू डोमाळे, डॉमिनिक मलबारी,गोलू नागमल, कल्पेश मगर, मंगलदास वाघ, मनोहर निकम, मसुद अंसारी, मयूर शिंदे, निखिल वाघ, नुरद्दीन शाह, प्रणव भोसले, प्रशांत बोरसे, शेख रईस, राजेश तिवारी, राजू चौधरी, रामेश्वर साबरे, रुबाब पिंजारी, राजेंद्र चौधरी, समद शेख, संदीप पाटील,तसवर बेग, विशाल भामरे, विश्वजीत देसले, मनीष आमले, दिलीप पाटील, वाल्मीक पाटील, गोपी आमले,सोनू पाटील, आदी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**साहेबांचे कौतुक व जेवणाचे आमंत्रण :** धुळ्यातून आलेल्या कार्यकर्त्यांचे शरद पवारांनी कौतुक केले .काही स्थानिक मंडळी गर्दी करीत असताना साहेबांनी त्यांना रोखले व म्हणाले की, 400 किलोमीटर वरून धुळेकर आलेले आहेत त्यांना पहिले वेळ देऊ . त्यानंतर साहेबांनी आलेल्या धुळेकरांना जीवनाचे आमंत्रण दिले . सर्व कार्यकर्त्यांची जेवणाची स्पेशल व्यवस्था करण्यात आली . साहेबांकडून जेवण मिळाल्याने कार्यकर्ते आनंदीत झाले . साहेबांनी दिलेला वेळ, केलेले कौतुक व जेवणाचे आमंत्रण यामुळे धुळेकर कार्यकर्ते खूप खुश झाले .

# गव्हाला पाणी देताना हृदयविकाराने मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** फुलंब्री तालुक्यातील खामगाव गोरक्ष येथे



एका ३४ वर्षीय नवतरुणाचे गहू पिकाला पाणी भरताना हृदयविकाराच्या झटक्याने दि. ५ मार्च मंगळवार रोजी मध्यरात्री मृत्यू झाल्याची घटना घडली. धुपाजी विश्वनाथ सोनवणे (३४, रा. खामगांव ता. फुलंब्री) असे मृताचे नाव आहे. हा तरुण गट ७३५ क्रमांक मध्ये ४- ५ मार्च मध्यरात्री पाणी भरण्यासाठी गेला असता तो सकाळी घरी न आल्याने त्याची पत्नी त्याला पाहण्यासाठी शेताकडे गेली असता तो गहू पिकामध्ये दांडामध्ये मृत्यू अवस्थेत आढळून आला.

# मराठा आरक्षणाची धग कायम; तरी तालुक्यात पुढाऱ्यांना प्रवेश खुला

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मराठा आरक्षणाची धग कायम असून सरकारने दहा टक्के आरक्षण देवून मराठा आरक्षणातील तीव्रता कमी केली आहे. तर अद्याप खुलताबाद तालुक्यात व रस्ता रोको आंदोलन सुरुच आहे. गावागावात पुढाऱ्यांना प्रवेश बंदचे फलक झळकत असले तरी सद्या तालुक्यात पुढाऱ्यांना प्रवेश खुला असल्याचे चित्र आहे. तालुक्यात मराठा आरक्षणाची तीव्रता कमी झाली असून सरकारने दहा टक्के आरक्षण जाहीर करुन आंदोलनाची तीव्रता कमी केली आहे. दुसरी कडे सकल मराठा समाजाचे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील ही आमरण उपोषणवरून लाक्षणिक उपोषणवर आले आहे.तर सकल मराठा समाजाचे आरक्षणला घेवून जी तीव्रता होती ती कमी झाली असुण सरसकट आरक्षण व सगेसोयरे आरक्षणला घेवून सरकारने भुमिका बाजुला ठेवून कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर पावले उचलली असल्याने आरक्षणची तीव्रता कमी झाली.तर खुलताबाद तालुक्यात तर ठिकठिकाणी पुढाऱ्यांना प्रवेश बंदचे फलक झळकत असले तरी तालुक्यात पुढाऱ्यांना विकास कामे, लोकार्पण सोहळा, सन्मान,बक्षीस वितरणच्या माध्यमातून गावांत शहरांत ये- जा चालु केली असुण यात भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आदि पक्षांचे पुढारी बिंधास्त ये जा करत आहे.मराठा सकल समाजाचे युवक तरुण कार्यकर्ते पदाधिकार विविध पक्षात विभागलेले असल्याने एकमेकांस विरोध करता येत नाही.मग आमचे आले तुमचेही येवू द्या. असा प्रकार घडत गेल्याने आता सर्वच पक्षाचे पुढारी गाव शहरात प्रवेश करत असुण सकल मराठा समाजाचे तरुण यूवक कार्यकर्ते तेच पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी असल्याने पुढाऱ्यांना प्रवेश खुला झाल्याचे चित्र आहे.हे विशेष.

# 'उत्कर्ष'साठी समाजकार्य विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे



समर्थ व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना. या योजनेअंतर्गत वर्षभर विविध शिबिरांचे, स्पर्धांचे आयोजन होत असते. त्यातलीच एक महत्त्वाची राज्यस्तरीय स्पर्धा म्हणजे उत्कर्ष. उत्कर्ष २०२३-२४ राज्यस्तरीय सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धा दिनांक १७ मार्च ते २० मार्च २०२४ या कालावधीत कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. आनंदाची बाब म्हणजे या स्पर्धेसाठी गोंडवाना विद्यापीठाच्या संघात सुशीलाबाई रामचंद्रराव मामीडवार समाजकार्य महाविद्यालयातील प्रेम जरपोतवार, सुमित काकडे, वैष्णवी राजगडकर व नीलिमा कारमेंगे यांची निवड झाली. या चारही स्वयंसेवकांचा राष्ट्रीय सेवा योजनेतील सहभाग हा कायमच उत्कृष्ट राहिलेला आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयश्री कापसे , कार्यक्रम अधिकारी प्रा.किरणकुमार मनुरे व प्रा.डॉ ममता ठाकुरवार, प्रा. संतोष आडे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# दिव्यांग प्रहार जनशक्ती पक्षाचे तहसीलदारांना आक्रोश निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** 5 मार्च रोजी जळगाव जामोद संग्रामपूर या दोन्ही तालुक्यातील हजाराचे संख्येने दिव्यांग बांधव आपल्या मागण्या घेऊन तहसीलदार यांना आक्रोसपणे निवेदन देण्यात आले. दिव्यांग बांधवांना सर्व दिव्यांग बांधवांना सरसकटपणे अंतोदय कार्ड देणे आवश्यक आहे पण बोटावर मोजण्या इतकेच दिव्यांग बांधवांना अंतोदय कार्ड देण्यात आले राहिलेले सर्व दिव्यांग बांधव या योजनेपासून वंचित आहे. त्याच पद्धतीने संजय गांधी निराधार योजनेत महाराष्ट्र वगळता बाकी राज्यांमध्ये दिव्यांग बांधवांना मोठ्या प्रमाणात मानधन मिळते पण महाराष्ट्रामध्ये तुटपुंज्य स्वरूपात म्हणजे 1500/- रुपये मिळते यात वाढ करून तीन हजार रुपये देण्यात यावे तसेच दिव्यांग बांधव मोठ्या प्रमाणात शिक्षित आहे स्वतःच्या पायावर उभे राहता यावे म्हणून शासनाकडे अपंग बीज भांडवल योजनेत, जिल्हा उद्योग केंद्र यामधून उद्योगासाठी केसेस मंजूर होतात पण बँका या ठिकाणी अपंग बांधवांना लोन देण्यास नाहक त्रास देतात त्यामुळे असा बँक मॅनेजर कायद्यात्मक कारवाई होणे गरजेचे आहे , तसेच सर्व दिव्यांग बांधवांना घरकुल योजना मिळणे आवश्यक आहे आधी मागण्यांसह माननीय तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले यावेळी तालुका प्रहार चेअध्यक्ष नारायण महालेतेजराव पाटील, सरदार अवासे,गणेश वसुले ,दिगंबर अविनाश ,गोविंदा वाघ, श्रीरंग बादरे, नारायण खंडारे, जगन्नाथ कोयटे ,नरसिंग चव्हाण व राहुल चंदनकर अनेक अपंग बांधव उपस्थिती होते ना दिल्यास अपंग बांधवांच्या वतीने येणाऱ्या लोकसभेवर बहिष्कार टाकण्यात येईल असा इशारा सुद्धा देण्यात आला.

# भिडे गुरुजींवरील हल्ल्याचा कोपरगावात निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** अनेक युवकांचे मार्गदर्शक असलेले संभाजी भिडे गुरुजी यांच्यावर भ्याड हल्ला करणाऱ्यांचा मास्टर माईंड शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करा अशी मागणी कोपरगाव येथील हिंदू जनजागृती समितीने नुकतीच कोपरगाव तहसीलदार यांचेकडे केली आहे.

त्यांनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की,"संभाजी भिडे गुरुजी म्हणजे ऋषीतुल्य व्यक्तिमत्व मानले जात असून महाराष्ट्र, कर्नाटक या दोन्ही राज्यातील अनेक युवकांना दिशा देऊन देव देश व धर्म यांच्या रक्षणासाठी कृतिशील केलेले आहे.त्यांनी केलेल्या प्रेरणेमुळे अनेक युवक राष्ट्रधर्म रक्षणासाठी कृतीशील झालेले आहेत, तसेच व्यसनांपासून दूर झालेले आहेत. त्यामुळे संभाजी भिडे गुरुजी हे अनेक युवकांचे प्रेरणास्थान आहेतअसे असताना गुरुजींवर वेगवेगळ्या ठिकाणी काही समाजकंटकांकडून आक्रमणे करण्याचा त्यांना त्रास देण्याचा त्यांच्या गाड्या अडवण्याचा निषेधार्थ प्रकार होत आहे. मनमाड (जिल्हा नाशिक) येथे २९ फेब्रुवारी रोजी अशाच प्रकारची घटना रात्री साडे अकराच्या सुमारास घडली आहे. स्वतःला आंबेडकरवादी म्हणणाऱ्या काही माथेफिरूंनी त्यांच्या गाडीवर प्राणघातक हल्ला केला. या वेळेस आक्रमण करताना गाडी अडवून अश्लील भाषेत शिवीगाळ केली,पायातील बूट व अन्य तत्सम वस्तूंचा उपयोग करून गाडीच्या काचा फोडण्याचा गंभीर प्रकार केला.पूजनीय गुरुजींसारख्या व्यक्तिमत्त्वावर तसेच वयोवृद्ध व्यक्तीवर अशा प्रकारचा भ्याड हल्ला हे निषेधार्ह असून या संदर्भातील निवेदन कोपरगांव येथे कोपरगांव येथील नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते व पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांना हे निवेदन देण्यात आले. या निवेदनाच्या माध्यमातून या घटनेमागे जे दोषी आहेत त्यांना पकडून त्वरित त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. यांचे मास्टरमाईंड शोधून एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये हा त पूर्वनियोजित कट,तर नाही ना ? याची चौकशी करावी संभाजी भिडे गुरुजी यांना लवकरात लवकर सुरक्षा पुरवण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या. यावेळी सर्वश्री व धारकरी, दत्तात्रय भागिले, सूरज रायते, बबन शिरसाठ, विजय गायकवाड, शुभम शेरे, आकाश चिटणीस, ओंकार साईनाथ येवले, मनोज मुळेकर, राहुल गिरमे, आकाश चांदर, तुषार जाधव, दिलीप सारंगधर, देवेंद्र पंडोरे, भारत गायकवाड शुभम इंदरखे, पंडू गुंजाळ हे उपस्थित असल्याची माहिती हिंदू जनजागृती समितीचे प्रदीप देशमुख यांनी दिली आहे.



## प्रेस संपादक, पत्रकार सेवा संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी शिवराज पवार यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी वतनवाला या वृत्तपत्राचे पत्रकार शिवराज पवार यांची चौथ्यांदा फेर निवड करण्यात आली आहे.शिवराज पवार पत्रकारिता,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असून त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ लोहा तालुकाध्यक्ष पदी २०२०-२१ पासून आजतागायत सलग तिसऱ्यांदा जबाबदारी पेलली.प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष डी टी आंबेगावे यांच्या आदेशानुसार व राज्य सल्लागार प्राचार्य डॉ वसंत बिरादार, मराठवाडा संघटक बा पु गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हाध्यक्ष संजीवकुमार गायकवाड यांनी आता सलग चौथ्यांदा लोहा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली असल्याचे जाहीर केले.

शिवराज पवार यांचे संघाच्या बळकटीकरणासाठीची भूमिका, पत्रकारांसह विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, तळागाळातील लोकांचे हाताळत असलेले प्रश्न नेहमीचा विधायक कामातील सक्रिय सहभाग, दांडगा जनसंपर्क पाहता त्यांची पुनश्च प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी निवड केली असल्याचे जिल्हाध्यक्ष संजीवकुमार गायकवाड यांनी जाहीर केले. सन- २००३ पासून वर्तमानपत्रात सण-उत्सव, महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी निमित्त विविध दृष्टिकोनातून लेख प्रकाशित सन २०१६-१७ पासून आजतागायत त्यांचे वृत्तपत्र क्षेत्रातील कार्य अतिशय उत्कृष्ट आहे. शिवराज पवार संघाच्या नियमांचे अधीन राहून, संघ बळकटीकरण व संघाची ध्येयधोरणे पूर्णत्वास



नेण्यासाठी अधिक प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संघाचे संस्थापक अध्यक्ष डी. टी. आंबेगावे, मंत्रालय व विधिमंडळ प्रमुख पंडित मोहिते- पाटील राज्य महिला अध्यक्षा डॉ. सुधाताई कांबळे, राज्य सांस्कृतिक प्रमुख प्रशांत विलणकर, राज्य उपाध्यक्ष पंकज वानखेडे विनायक सोळसे, महेश जाधव, विशाल पवार, राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राजू जाधव, दशरथ अडसूळ, अशोक इंगवले, साईनाथ जाधव, नवनाथ कापले, शमशुद्दीन शेख, महिला उपाध्यक्षा सविता चंद्रे, राज्य कोषाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, युवा राज्याध्यक्ष डॉ. नितीन शिंदे, युवा कार्याध्यक्ष प्रशांत राजगुरू, विदर्भ अध्यक्ष केशव सवळकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष चिंधे, कार्याध्यक्ष शशिकांत पोरे, संपर्क प्रमुख जय कराडे, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमती व्याहाळकर, कार्याध्यक्ष हुकूमत मुलाणी, संपर्क प्रमुख आनंद भालेराव, संघटक बापू गायकर, कोकण अध्यक्ष जयप्रकाश पवार, संपर्क प्रमुख संतोष वाव्हळ, कोकण महिलाध्यक्षा दीपिकाताई चिपळूणकर, कोकण संघटक श्रीराम कदम, कोकण उपाध्यक्ष योगेश भामरे, कायदेविषयक सल्लागार ॲड. अमोल सकट, ॲड. रत्नाकर पाटील, ॲड.जितेंद्र पाटील, ॲड परेश जाधव, राज्य सल्लागार प्राचार्य डॉ वसंत बिरादार, विठ्ठल शिंदे, नांदेड जिल्हाध्यक्ष संजीवकुमार गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष भारत सोनकांबळे, जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव सोनकांबळे, महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व तालुका पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या.

## सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी विलास शिंदे, तर व्हा. चेअरमनपदी शिवाजी मते

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्याने संपूर्ण देशाला सहकार चळवळीची प्रेरणा दिली असून जिल्ह्यात सहकार क्षेत्राचे मोठे जाळे निर्माण झाले आहे त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्याला योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने मिळाला आहे, शेतकऱ्यांच्या प्रगतीत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे, अहमदनगर जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी विलास शिंदे तर व्हा. चेअरमनपदी शिवाजी मते यांची बिनविरोध निवड झाली असून चेअरमन पदासाठी विलास शिंदे यांच्या नावाची सूचना संचालक भाऊसाहेब मोटे यांनी मांडली तर अनुमोदन संचालक सुधाकर नरवडे यांनी दिले.

तसेच व्हा चेअरमनपदी शिवाजी मते यांच्या निवडीची सूचना संचालक प्रमोद गोंदकर यांनी मांडली तर अनुमोदन प्रशांत राऊत यांनी दिले, यावेळी प्रकाश नाईकवाडी, सुधीर राळेभात, सीताराम वर्पे, दीपक पठारे, सुदाम भुसे, युवराज तनपुरे, किरण पाटील, राहुल राजळे, अनिकेत शेळके, गणेश शेळके, भीमा भिंगारदिवे, ज्योती साबळे, रुपाली लांडगे, आदी उपस्थित होते, यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी शुभांगी गोंड यांनी काम पाहिले.

यावेळी चेअरमन विलास शिंदे म्हणाले की, अहमदनगर जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सहकारी सेवा संस्थेच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील, याचबरोबर केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जाईल,जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खत पुरवठा कमी पडून दिला जाणार नाही, जिल्ह्यातील नेते मंडळींनी एकत्र येऊन माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी दिली, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली सर्व संचालक मंडळाला विश्वासात घेऊन निर्णय घेतले जातील.



## ऑलराऊंडर खेळाडू खालिदची टी-20 च्या महाराष्ट्र संघात निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराची दाट लोकवस्ती असलेल्या जुने धुळे भागातील एका सामान्य कुटुंबातील खालीद शेख जमील शहा या तरुणान क्रिकेट क्षेत्रात नाव कमावलयं. क्रिकेटमध्ये ऑलराऊंडर असलेल्या खालीदची टी-20 क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडियान राज्यस्तरीय मॅचेससाठी खेळण्याची संधी दिलीय. छत्रपती संभाजी नगरमध्ये 11 फेब्रुवारीला झालेल्या निवड चाचणीत त्याची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली. गोव्याच्या मडगावमध्ये 22 ते 25 एप्रिल दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय सामन्यांमध्ये तो महाराष्ट्र संघातर्फे खेळणार आहे. राज्यभरातून आलेल्या खेळाडूंमधून निवड झाल्यान त्याचं कौतुक होतय. खालीद हा सामान्य कुटुंबातून आलेला तरुण. त्याचे वडील सामाजिक कार्यकर्ते. खालीदन डी.फार्मसीचा अभ्यासक्रम पूर्ण केलाय. सन 2013 पासून त्याने क्रिकेट खेळायला सुरुवात केली. धुळ्यातील एस एस व्ही पी एस महाविद्यालयाच्या मैदानात चालणाऱ्या स्पोर्ट्स मेनिया सेवन क्लबचा तो खेळाडू असून मोसिन शेख त्याचे कोच आहेत. सामान्य परिस्थिती असूनही खालिदला त्याच्या आईवडीलांनी क्रिकेट खेळायला प्रोत्साहन दिलं. खालीदन क्रिकेटच्या क्षेत्रात स्वतःचच नव्हे तर धुळे शहराचं देखील नाव उज्ज्वल केलयं. म्हणूनच धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे त्याचा नुकताच सत्कार करण्यात आला. टी-20 असोसिएशनच्या महाराष्ट्र संघात निवड झाल्यानं माझी जबाबदारी वाढलीय. भविष्यात देशासाठी इंटरनॅशनल क्रिकेटमध्ये खेळण्याची इच्छा त्यान सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या साक्री रोडवरील पत्रकार भावनात आयोजित सत्कार समारंभाला पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, मिलिंद बैसाणे, चंद्रशेखर पाटील, नूरखान पठाण, विद्यमान अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सेक्रेटरी सचिन बागुल, माजी कार्यकारणी सदस्य सुनील बैसाणे, विद्यमान कार्यकारणी सदस्य प्रकाश शिरसाठ, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, जमील शाह, पत्रकार दिनेश निकुंभ, जमील शाह, प्रभाकर वाघ, क्रिकेटर खालीदचे वडील जमील शेख उपस्थित होते.




## जिल्ह्यातील गोशाळांसाठी 25 लाखांच्या मदत निधीचे खा. विखेंच्या हस्ते वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्यात सध्या दुष्काळी परिस्थिती असून अनेक ठिकाणी पाण्याची व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. इंजि. यश प्रमोद शहा जैन युवक ट्रस्टने जिल्ह्यातील सर्वच गोशाळांना प्रत्यक्ष भेट दिली. या समस्येची गंभीर दखल घेत त्यांनी जिल्हाधिकारी तसेच पशुसंवर्धन उपायुक्त यांना प्रत्यक्ष भेटून मार्ग काढण्याची विनंती केली. मुंबईतील समस्त महाजनचे गिरीश भाई शहा आणि आदिजीन चॅरिटेबल ट्रस्ट चे जयेश भाई शहा यांच्याशी फोनवरून चर्चा केली व प्रत्यक्ष भेट घेऊन गोशाळा भेटीचा तपशील त्यांना दिला. यश शहा यांच्या पाठपुरावामुळे जवळपास सर्वच गोशाळांना मुंबईतील दोन्ही संस्थांकडून 25 लाखांपेक्षा जास्तीचा मदत निधी चा .यश शहा यांच्याकडे सुपूर्त केला. हा निधी - पाण्याची टाकी, शेड, चारा-पाणी, औषधे अशा विविध गोमाता सेवेसाठी मागणीनुसार गोशाळांना मिळाला. 25 लाखांच्या चेक चे वितरण अहमदनगर खा. सुजय विखे पाटील अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी पशुसंवर्धन उपायुक्त तुंभारे यांच्या हस्ते केले. यश शहा, पायल शहा व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व गोशाळा संचालकांच्या हातात चेक सुपूर्त केले गेले. यावेळी जिल्ह्यातील उपस्थित संचालकांनी प्रथमच एवढा मोठा निधी यश शहा यांच्या प्रयत्नामुळेच अहमदनगर जिल्ह्यातील गोशाळांना मिळाल्याचे कार्यक्रमात आपल्या प्रतिक्रियेत आवर्जून सांगितले. याप्रसंगी शहा यांनी गोशाळांना आवाहन केले की जिल्ह्यातील सर्व गोशाळांनी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांची लवकरात लवकर पूर्तता करून घ्यावी.जेणेकरून भविष्यातही गोमाता सेवेसाठी त्यांना दोन्ही संस्थांच्या वतीने मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करता येईल. अहमदनगर जिल्ह्याच्या वतीने यश शहा यांनी गिरीश भाई व जयेश भाईंचे- निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष आभार मानले.

## राज्य सरकार देणार गोशाळांना अनुदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यातील ३२४ तालुक्यांतील १७८ गोशाळांना २२ कोटी ८३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गोवर्धन गोवंश समिती योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षात पात्र ठरलेल्या गोशाळांना हे अनुदान पशुसंवर्धन विभागाकडून दिले जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली.आयोगाच्या कार्यालयात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेला आयोगाचे सदस्य सुनील सूर्यवंशी, संजय भोसले, सनतकुमार गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त प्रकाश अहिरराव, उपायुक्त भागवत देशमुख उपस्थित होते.




# बाजार सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्र वाऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ता.खुलताबाद)येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वाऱ्यावर असून या प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची हेळसांड होत आहे.कारण येथे मनमानी कारभार चालतो बाजार सावंगी हे मुख्य बाजारपेठेचे गाव असून 30 ते 35 खेडे लागून आहे त्यामुळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. येथे कोट्यावधी रुपये खर्च करून भव्य असं प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात आलं आहे.तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी भव्य सुसज्ज सर्व सोयीयुक्त आलिशान निवासस्थाने या ठिकाणी बांधण्यात आलेली आहेत प्राथमिक आरोग्य केंद्र असेल की निवासस्थाने असतील हे सर्व कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आले आहेत मात्र त्याचा काहीही उपयोग नाही कारण या प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना वेळेवर कुठल्या सुविधा उपचार मिळत नाही हे वारंवार निदर्शनास आले आहे कारण येथे वैद्यकीय अधिकारी कधीच वेळेवर हजर नसतात सतत कुठल्या ना कुठल्या कारणाने उशिरा येतात मात्र वेळोवेळी मागणी होऊनही येथील जो कारभार चालतो त्यात तिळमात्र ही बदल झालेला नाही त्यामूळे रुग्ण त्रस्त झाले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राची वेळ ही सकाळी साडेआठ ते बारा आहे वैद्यकीय अधिकारी हे कधीच साडेआठ वाजता या ठिकाणी हजर नसतात आणि दवाखाना वेळेवर बारा वाजता बरोबर बंद केला जातो.तसेच कोणी वेळेबद्दल काही बोलू नये म्हणुन येथे वेळेचा फलक ही लावलेला नाही.येथे तिन वैद्यकिय अधिकारी जागा आहेत मात्र त्यातली एक जागा तर कधी दोन जागा रिक्त असतात आणि मग उशीरा येणे किंवा गैरहजर राहण्याला ते सुद्धा निमीत्त केले जाते. डॉक्टरांच्या या मनमानी कारभाराला आणि याकडे कोणीच लक्ष द्यायला तयार नाही व तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की असं नाही व्हायला पाहिजे, वेळेवर यायला पाहिजे मात्र अशी वेळ काढूपणाची ही आश्वासने वेळोवेळी येथे सतत दिली जातात मात्र त्यात अजूनही बदल झालेला नाही. रात्रीच्या वेळी केव्हाही जर रूग्ण आले तर येथे डाक्टर निवासी कधीच नसतात.अप डाऊन करतात.कधी कुठलं तरी औषध उपलब्ध नसते म्हणजे एकंदरीत सर्व काही गोलमाल. मात्र यापुढे जर यात बदल झाला नाही तर पुढील दोन दिवसांमध्ये या प्राथमिक आरोग्य केंद्राला टाळे ठोकले जाणार आहे असा इशारा यावेळी उपस्थित भाजपचे खुलताबाद ता. अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे , पुंजाजी नलावडे येथील उपसरपंच कारभारी नलावडे, बबन पुंड, सुखदेव नलावडे व ग्रामस्थ यांनी यावेळी दिला आहे.

# माजी आ. कोल्हेनीं निधी दिला नाहीच; पण आलेला निधी पळवला

## माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** आम्हाला जाणीवपूर्वक विकासनिधी दिला जात नाही-दुजाभाव केला जातो हा आरोप करत नुकतेच शिर्डी येथे आंदोलन केले यावर माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांची ही तिखट प्रतिक्रिया आली आहे.

त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की,"ज्यांनी आंदोलन केले त्यांच्या मातोश्री तालुक्याच्या आमदार होत्या.आपण २०१६ ला कोपरगाव शहराचा लोकनियुक्त नगराध्यक्ष झालो होतो.कोपरगावच्या नागरिकांनी आपल्याला नगराध्यक्षपदी निवडून दिले या रागातून आ.कोल्हे यांनी कोपरगाव नगरपरिषदेला एकही रुपया निधी मिळू दिला नाही. त्याउलट आपण प्रयत्नपूर्वक मिळविलेला विशेष रस्ता अनुदान ०२ कोटी रु.निधीही त्यांनी पदाचा गैरवापर करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळविला म्हणून त्या विषयात मला उच्च न्यायालयातही जावे लागले. जे पेरले तेच उगवते हा निसर्गाचा नियम कदाचित या माय लेकांना माहिती नसावा.आपण तत्कालीन ना.विनोद तावडे यांना भेटून बंदिस्त नाट्यगृहासाठी ०२ कोटी रुपयांचा निधी आणला.पण त्यासाठी प्रयत्न करूनही जागा उपलब्ध झाली नाही.

वापर न झालेला तो निधी परत जाऊ नये यासाठी तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून आपण तो ०२ कोटी रुपये निधी नगर परिषद कार्यालय बांधकामासाठी वापरण्याची परवानगी मिळविली.कोपरगाव शहराला विकासनिधी मिळावा यासाठी आपण माझ्या सहकाऱ्यांसोबत वारंवार न चुकता मुंबईला जाऊन मंत्रालयात प्रयत्न करायचो.पण यांनी पदाचा गैरवापर करून सातत्याने अडथळे आणले.आपले दोन वर्षे कोरोना लाटेत वाया गेले.तरीही आपण इतरांपेक्षा जास्त विकासकामे केली असा दावा करून त्याबाबत तशी पुस्तिका प्रसिध्द केली असल्याचे आपल्या पत्रकात म्हटले आहे.



दरम्यान कोपरगाव नगरपरिषदेच्या २८ विकासकामांना न्यायालयातून स्थगिती आणणारेच आज विकास निधीसाठी आंदोलन करताहेत हा मोठा राजकीय विनोद मानला जाईल.कोल्हे गटाचे सर्व नगरसेवक,स्वतः आमदार कोल्हे व संजीवनीचेअनेक दूत यांनी मला सातत्याने अडथळेच आणले.माझे सहकारी विनायक गायकवाड यांच्या जागेबाबतचा कायदेशीर ठराव कोल्हे गटाने बहुमताच्या जोरावर मंजुरच होऊ दिला नाही. यांच्या भाटांनी "भैय्यासाहेबांना" भेटून घ्या ठराव मंजूर करू" अशी भाषा वापरली.

त्यांनी स्वतःच्या प्रभागातील विकासकामे व्हावीत म्हणून तरी ठराव मंजूर होऊ दिले हे जनतेचे नशीबच म्हणावे लागेल.

आपल्याला नगरपरिषद कारभारात अडथळे आणले नसते तर २०१९ मध्ये भाजपाचा एक आमदार नक्कीच वाढला असता असा दावा केला आहे.

मात्र २०१९ मध्ये आ.आशुतोष काळे आमदार झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात विकासनिधी मिळाला हे मान्यच करावे लागेल.हा मजकूर वाचून आम्हीच निधी आणला होता असाही दावा ते करणारच. कारण सगळ्या जगाचे कल्याण होईल इतकी निवेदने-पत्र संजीवनीच्या यंत्रणेने देऊनच ठेवलेली असणार ही चलाखी तालुक्याला नवी नाही.५० वर्षपासून व तीन पिढ्या परिचित आहे.कुठलेही काम मंजूर झाले कि लगेच जुनेच निवेदन प्रसिध्द करून श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करायचा,नको त्या श्रेयवादाची फ्लेक्स प्रसिद्ध करायची ही स्वतःला चलाख समजणारी मंडळी नेहमीच करतात हे जनतेला चांगलेच माहित आहे.

आपण नगराध्यक्ष झाल्यानंतर माजी आ.कोल्हे कोपरगाव नगरपरिषदेस किती निधी दिला व आ.आशुतोष काळे यांनी किती रुपये विकासनिधी मिळवून दिला हे दोघांनीही जाहीर केले तर जनतेलाही सत्य काय ते कळेल असा दावा करून आ.काळे यांचा गौरव केला आहे.

आपल्या कार्यकाळात पाच क्रमांकाचा साठवण तलाव काम सुरू झाले व आ.आशुतोष काळे यांच्यामुळेच भरघोस निधी मिळाला व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांचेमुळेच औद्योगिक वसाहत मंजूर झाली हे तर जगजाहीरच आहे.मग माजी आ.स्नेहलता कोल्हे यांनी तुमचे असे कोणते ठोस काम आहे हेही सांगितले तर बरे होईल असे आवाहन केले आहे व शेवटी निळवंडेची पुंगी वाजवून मतदारांना नादी लावले असल्याचा वास्तववादी टोला लगावून पण त्याचे पुढे काय झाले ? हे सर्व शहरास आणि तालुक्यास माहिती असल्याची कोपरखिळी माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांनी लगावली.




छत्रपती संभाजीनगर : लाईनमन दिवसानिमित्त महावितरणचे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र तसेच हर्सूल व एन-१२ शाखा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली. हर्सूल येथून रॅलीस सुरुवात होऊन हडको, सौभाग्य चौक, एसबीओए चौक, हर्सूल टी पॉइंट यामार्गे परत प्रशिक्षण केंद्रात समारोप करण्यात आला. अतिरिक्त कार्यकारी अभियंता वेंकटेश पेन्सलवार, सहायक अभियंता राजेंद्र राठोड यांच्यासह प्रशिक्षण केंद्राचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विजय सुरडकर, उपकार्यकारी अभियंता दीपक गडलिंग, रामदास डोंगरे, विजय जाधव व हर्सूल शाखा कार्यालयातील तांत्रिक कर्मचारी व एमजीएम तंत्रनिकेतन विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# अग्निवीर भरतीसाठी २२ मार्चपर्यंत फॉर्म भरा : विद्यासागर कोरडे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** भारतीय सैन्यात भरतीसाठीची अधिसूचना WWW.JOININDIANARMY.NIC.IN या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यात आली असुन इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळास भेट देऊन प्रोफाइल तयार करावी व २२ मार्च, २०२४ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन स्क्वॉड्रन लिडर विद्यासागर कोरडे, (निवृत्त), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहमदनगर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

सैन्यदलात अग्निवीर जीडी, अग्निवीर टेक्निकल, अग्निवीर ऑफिस असिस्टंट, अग्निवीर ट्रेड्समन (१०वी आणि ८ वी पास), मिलिटरी पोलिसांसाठी अग्निवीर महिला प्रवर्ग आणि एनए सप्टेंबर मधील नियमित प्रवेशासाठी अर्ज खुले आहेत.

फार्मा, टप्पा 01 मध्ये उमेदवारांना संगणक आधारित ऑनलाइन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी सूचना सविस्तरपणे वाचाव्यात. विषय



अधिसूचनेनुसार एनसीसी उमेदवार, तांत्रिक दृष्ट्या पात्र व्यक्ती, उत्कृष्ट क्रीडा व्यक्ती आणि माजी सैनिकांच्या मुलांना बोनस गुण आणि शारीरिक मोजमापात सूट दिली जाईल.

सर्व संबंधित तपशील अधिसूचनेत दिलेले आहेत, लेखी परीक्षेत निवडलेल्या उमेदवारांना संबंधित एआरओद्वारे भरती मेळाव्याला उपस्थित राहण्यासाठी बोलावले जाईल. आता प्रथमच अनुकूलता चाचणी देखील समाविष्ट करण्यात आली आहे. जी वैद्यकीय चाचणीपूर्वी घेतलो जाईल. अनुकूलता चाचणीसाठी उमेदवारांनी रॅलीच्या ठिकाणी पुरेशा बॅटरी लाइफसह फंक्शनल स्मार्टफोन आणि दोन जीबी डेटा आणणे आवश्यक असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आम्ही उद्योगांसाठी रेड कारपेट टाकतोय तर उद्योगांनीही स्थानिकांसाठी ग्रीन सिग्नल ठेवावा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूरात आजवर प्रदूषण निर्माण करणारेच उद्योग आलेत. पिरणामी 40 टक्के पेक्षा अधिक वन आच्छादन असुनही चंद्रपूर जिल्हा प्रदुषणाच्या बाबतीत देशात ओळखला जातो. असे असतांनाही आम्ही उद्योगांसाठी रेट कारपेट टाकत आहोत. तर उद्योगांनीही आपल्या उद्योगात स्थानिकांसाठी कायम ग्रिन सिग्नल ठेवावा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळ, जिल्हा प्रशासन आणि एम.आय.डी सी असोशिएशनच्या वतीने ॲडव्हान्टेज चंद्रपूर 2024 इंडस्ट्रीयल एस्पो आणि बिजझनेस कॉन्व्लेव्हरचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला वन मंत्री तथा जिल्हाचे पालकमंत्री सुधिर मुनगंटीवार, कौशल्य, रोजगार,



उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा, जिल्हाधिकारी विनय गौडा, एमआयडीसी असोशिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, चंद्रपूर हे देशाच्या मध्यभागी असलेले ठिकाण आहे. येथे दळनवळणाची साधने आहे. विज, पाणी, कोळसा, भूमी या सर्व गोष्टी येथे उपलब्ध आहेत. एंकदरित विचार केल्यास उद्योग वाढीसाठी पूरक असे वातावरण चंद्रपूरात आहे. त्यामूळे येथे उद्योग आले पाहिजे. मात्र हे उद्योग येथे येत असतांना स्थानिकांचाही विचार होणे अपेक्षित आहे. यातुन स्थानिकांसाठी रोजगार निर्मिती व्हावी असेही ते यावेळी म्हणाले. पाच हजार मेगावॅट पेक्षा अधिक विज आम्ही उत्पादीत करतो. ही थर्मल एनर्जी आहे. त्यामुळे प्रदुषणाचा सामना आम्हाला करावा लागत आहे. मागील वर्षी 30 पैकी 30 दिवस प्रदुषीत राहिल्याचा अहवाल आला आहे. असे असताना या विद्युत केंद्राचा फायदा आम्हाला नाही. त्यामुळे मोबदला स्वरूप जिल्ह्याच्या विकासासाठी उद्योगांना सवलतीच्या दरात विज दिल्या गेली पाहिजे असेही ते यावेळी बोलतांना म्हणाले. या कार्यक्रमात उद्योजकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वनरक्षक भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यात बऱ्याच वर्षांनंतर वनरक्षक पदासाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ या कालावधीत लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत राज्यातून सुमारे ६० हजार उमेदवार उत्तीर्ण झाले. या उमेदवारांची शारीरिक चाचणी मिहान परिसरात घेण्यात आली. मात्र, यादरम्यान एका उमेदवाराचा मृत्यू झाल्याने या भरती प्रक्रियेला गालबोट लागले आहे.

फेब्रुवारी २०२४च्या अखेरीस मिहान परिसरात उमेदवाराची शारीरिक चाचणी प्रक्रिया पार पडली. सलग चार दिवस चाललेल्या या प्रक्रियेत नागपूर विभागात सुमारे ३० हजार उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली. मात्र, शारीरिक चाचणी प्रक्रियेत अव्यवस्था असल्याचा आरोप काही उमेदवारांनी केला. त्यांनी या चाचणीवर आक्षेप घेतले, त्यांना पुन्हा एक संधी देण्यात आली. चार मार्चला अशा उमेदवारांची पुन्हा शारीरिक चाचणी घेण्यात आली. यादरम्यान महिला उमेदवारांना तीन तर पुरुष उमेदवारांना पाच किलोमीटर धावण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते. सोमवारी, चार मार्चला सकाळी सात वाजता मिहान परिसरात ही स्पर्धा सुरू झाली. यात यवतमाळ जिल्ह्यातील सचिन लांबट हा युवक देखील सहभागी होता. सकाळी सात वाजता स्पर्धेला सुरुवात झाली आणि अंतिम टप्पा गाठण्यासाठी अवघे दहा ते पंधरा मीटरचे अंतर बाकी असताना सचिन लांबट हा उमेदवार कोसळला. वनखात्याच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ धाव घेत त्याला तंबूत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने आपण हे अंतर पूर्ण करणार असे सांगितले. त्याला पुन्हा संधी देण्यात येईल असे सांगून त्याला तंबूत आणले आणि डॉक्टरांनी तपासणी केली.



## नगर परिषदेला मिळाला कायम मुख्याधिकारी

### मुख्याधिकारीपदी प्रियंका टोंगे रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** नगरपालिकेला गेल्या अनेक वर्षापासून कायमस्वरूपी मुख्याधिकारी लाभला नसल्याने नगरपालिकेला काय दृष्ट लागली असेच होते. जिंतूर शहरातील नागरिकांची कामे ही वेळेवर होत नव्हती त्यामुळे जिंतूर शहरातील अनेक कामे खोळंबून पडलेली राहत होती. त्यातच मुख्याधिकारी कायमस्वरूपी नसल्यामुळे नागरिकांना परेशानींना तोंड द्यावे लागत होते. शेवटी काही वर्षानंतर का होईना पण जिंतूर नगरपालिकेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी म्हणून दिनांक 4 मार्च 2024 रोजी सौ. प्रियंका टोंगे यांनी पदभार स्वीकारला असून जिंतूर शहरातील भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत, प्रमोद कराड ,सुधीर सूर्यवंशी, आकाश चराटे, शरीफ पठाण, विलास राव देशमुख उर्दू शाळेचे संचालक काजी वासेफ, माझी उपनगराध्यक्ष सलीम भाई आदी कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. व शहरातील नागरिकांच्या अडीअडचणी व कामे लवकर मार्गी लागतील अशी आशा व्यक्त केली.

## डॉ. धोंडोपंत मानवतकर यांना नागपूरचा 'जीवनव्रती' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**मंठा :** अण्णा भाऊ साठे साहित्य, कला अकादमी, नागपूर या संस्थेच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक, कवी डॉ.धोंडोपंत मानवतकर यांना 'जीवनव्रती' पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. मंठा, जि.जालना येथील सुप्रसिद्ध कवी, लेखक डॉ.धोंडोपंत मानवतकर यांना नागपूर येथील अण्णा भाऊ साठे साहित्य कला अकादमी चे अध्यक्ष मा. चंद्रकांत वानखेडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही निवड झाल्याचे कळविले आहे. डॉ.धोंडोपंत मानवतकर हे सामाजिक जीवनात गेल्या चार दशकांपासून सामाजिक, सांस्कृतिक, व साहित्यिक क्षेत्रात व्रतस्थ राहून कार्य करत आहेत. त्यांचे योगदान वाखाणण्याजोगे व इतरांना प्रेरणादायी आहे. शिवाय त्यांच्या एकूणच कार्याने सांस्कृतिक व सामाजिक जीवनात सलोखा निर्माण केला असून साहित्यिक क्षेत्रात मोलाची भर घातली आहे.

नागपूर येथील महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभाग, मुंबई द्वारे पुरस्कार प्राप्त अण्णा भाऊ साठे साहित्य, कला अकादमी या संस्थेने डॉ.धोंडोपंत मानवतकर यांच्या कार्याची दखल घेऊन "जीवनव्रती" हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे.

या पुरस्काराचे स्वरुप स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे असून हा पुरस्कार ११ मार्च २०२४ रोजी नागपूर येथे होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय अण्णा भाऊ साठे साहित्य व संस्कृती संमेलनात देण्यात येणार आहे. हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे आविष्कार साहित्य मंडळातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.




## 'कष्टाच्या वाटा' बाल कथासंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथ पॉंलीटीकल महाविद्यालय एमआयडीसी परीसरातील जैन्सपिनर येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृध्दी तीन दिवसाच्या प्रशिक्षण केंद्रात प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांचा अतिशय दर्जेदार आणि कसदार बाल कथासंग्रह 'कष्टाच्या वाटा' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. याप्रसंगी पैठण पंचायत समितीचे विषय साधनव्यक्ती म्हणून शेख अब्दूल रऊफ यांची मुख्य उपस्थिती होती. प्रशिक्षण देणाऱ्या विषय तज्ञ, शेख फारूख, रंगनाथराव लघाणे, शेख अलीम, श्रीमती सुरेखा जैन, रत्नमाला अंकमवार, शेख कलीम, भीमाशंकरचे बच्छेसर हे व्यासपीठावर विराजमन होते. तसेच प्रशिक्षण घेण्यासाठी पैठण तालुक्यातील विविध शाळेतून आलेले शिक्षक आणि शिक्षिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.शेवटी कवी अय्युब पठाण लोहगावकर, " कष्टाच्या वाटा " या कथासंग्रह विषयी सविस्तर माहिती सांगितली.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर